cmyk

## संपादकीय

### पावसाळी ट्रेलर धडकी भरविणारे

गत काही दिवसांपासून राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. पुढील चार दिवस राज्यात पावसाची अशीच स्थिती राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. गत तीन-चार दिवसांपासून महाराष्ट्रात पावसाने थैमान घातले आहे. पुणे, मुंबई, नाशिक, मराठवाडा, कोकण आणि विदर्भात धो-धो पाऊस पडतो आहे. मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटात पावसाचे बरसणे सुरू आहे. कर्नाटक किनारपट्टीजवळ चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्रात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### भुजबळांचे शिवभोजन थाळीवर मोठे विधान

नाशिक-राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांची मंत्रिमंडळात पुन्हा एंट्री झाली आहे. अन्न आणि नागरी पुरवठा खातं हे माझ्याकडे तिसऱ्यांदा आले आहे असे सांगत त्यांनी शिवभोजन थळीवर भाष्य केले आहे. शिवभोजन थाळी योजना बंद करणार अशा चर्चा मी पण ऐकल्या होत्या. मात्र मी मुख्यमंत्र्यांना भेटलो आणि सांगितले की रोज दोन लाख लोकांना एक वेळचे जेवण मिळते. ही योजना बंद करु नका हे मी सांगितले असल्याचे यावेळी बोलताना भुजबळ म्हणाले.

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-३० | शनिवार, दि.२४ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# यंदा मान्सून लवकर; शेतातील कामे मात्र तशीच!

## आयएमडीचा नवा अंदाज समोर; केरळात उद्या धडकणार

नवी दिल्ली । वृतसंस्था

**गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा राज्यात आणि देशात मान्सून लवकर धडकणार असला तरी सततच्या पावसाने शेतातील कामे मात्र जशास तशी असल्याचे चित्र आहे. मशागतीची कामेच होत नसतील तर जूनमध्ये पेरणी करायची कशी असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. दरम्यान, रविवारी मान्सून हा केरळात दाखल होणार असल्याचा आयएमडीचा नवा अंदाज आहे.**

गेल्या काही दिवसापासून राज्यात मान्सूनपुर्व पाऊस बरसत असून अनेक





ठिकाणी शेतीचे मोठे नुकसान सुध्दा झाले आहे. पावसाळा असल्याप्रमाणे सध्या पाऊस बरसत आहे. त्यामुळे शेतीतील पेरणीपुर्वी कामे खोळंबली असून शेतकरी चिंताग्रस्त आहेत. पाऊस उघडत नसल्याने शेतीतील कामे करायची कशी आणि पेरणी करायची कशी असा प्रश्न सध्या शेतकऱ्यांच्या समोर आहे. भारतीय हवामान विभागाने ◀◀ पान २ वर

### १५ जूनपर्यंत मान्सून बहुतांश भाग व्यापणार

पंधरा जूनपर्यंत देशातील बहुतांश भागात मान्सूनने व्यापण्याची शक्यता आहे. दरम्यान यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज भारतीय हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे.

### सततच्या पावसाने शेती पडक पडली

गेल्या काही दिवसापासून भर उन्हाळ्यात पावसाळ्याप्रमाणे पाऊस सुरु आहे. एक दिवसाचाही खंड न देता पावसाची रिपरिम तर कधी कोसळधार पडत आहे. त्यामुळे शेतीतील उन्हाळ पिके काढल्यानंतर जी मशागत करावी लागते ती सध्या पावसामुळे करता येत नसल्याची परिस्थिती आहे. एकंदरीत सततच्या पावसाने शेती पडक पडण्याची वेळ आल्याचे चित्र आहे.

### यंदा चांगला पाऊस

दरम्यान यंदा मान्सूनबद्दल गुडन्यूज आहे, ती म्हणजे देशात पावसाचे प्रमाण चांगले राहणार आहे. सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यंदा भारतामध्ये सरासरी १०७ टक्के पाऊस पडू शकतो असा अंदाज आहे.

## थोडक्यात...

### निवडणूक आयोगाकडून दोन निर्णय जाहीर

मुंबई-निवडणूक आयोगाकडून २ महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. मतदारांच्या सोयीसाठी आणि मतदानादिवशी व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने हे निर्णय जाहीर केले आहेत. त्यानुसार मतदान केंद्राबाहेर मोबाईल ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच प्रचारासाठीची मर्यादादेखील नव्याने निश्चित करण्यात आली आहे.

### विठ्ठल रुक्मिणी मंदिरात ड्रेस कोड लागू करा

पंढरपूर-विठ्ठल रुक्मिणी मंदिरात ड्रेस कोड लागू करावी,अशी मागणी वारकरी संप्रदायाकडून करण्यात आली आहे. वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जोगदंड यांनी मंदिर समितीला लेखी निवेदन देऊन ही मागणी केली आहे.

### भिडेंना मेंटल हॉस्पिटलमध्ये टाका-संभाजी ब्रिगेड

मनोहर पंत उर्फ संभाजी भिडे यांचा शिवराज्याभिषेक सोहळ्याला विरोध केला आहे. ६ जून ही तारीख 'नामशेष' करून टाका असं म्हणणं म्हणजे ज्या प्रवृत्तींनी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करायला विरोध केला होता त्यांच्याच कुळातील हा संभाजी भिडे आहे असं म्हणायला हरकत नाही, त्यांना मेंटल हॉस्पिटलमध्ये टाका अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे.

### ऑपरेशन सिंदूरनंतर ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट

नवी दिल्ली-ऑपरेशन सिंदूरनंतर केंद्र सरकारने ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट आता हाती घेतले आहे. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, नक्षलवाद जवळपास संपुष्टात आणला आहे. सरकारने नक्षलवाद्यांचे पूर्ण कंबरड मोडून काढलं आहे. केंद्र सरकारने ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट हाती घेतलं आहे.संपूर्ण देशावा मोदींचा अभिमान वाटत असल्याचे म्हटले आहे.

### कांदा उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात

नाशिक-एकीकडे अवकाळी पावसाने अस्मानी तर दुसरीकडे कांद्याला निच्चांकी बाज़ार भाव मिळत असल्याने सुल्तानी संकटात कांदा उत्पादक शेतकरी सापडला आहे. येवला बाजार समितीत गोल्टी कांद्याला १३५ रुपये प्रति क्विंटलला बाजार भाव आहे. म्हणजे १ रुपया ३५ पैसे किलो. त्यामुळे उत्पादनासाठी लागलेला खर्च देखील निघणार नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

### ठाण्यात कोरोनाचे ३ रुग्ण आढळले

ठाणे- मुंबईपाठोपाठ ठाण्यातही कोरोनाचा शिरकाव झाला असून ठाणे शहरात कोरोनाचे ३ रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे महापालिकेचा आरोग्य विभाग सतर्क झाला आहे.

### छगन भुजबळांकडे अन्न व नागरी पुरवठा खाते

मुंबईः छगन भुजबळ यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा विभागाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यापूर्वी सुद्धा अनेक वेळा त्यांच्यावर याच खात्याची जबाबदारी देण्यात आलेली होती.

### बारा फुटांचे होणारे शेत रस्ते

मुंबई -राज्यातील शेतीच्या बांधांवरून जाणारे शेत रस्ते आता १२ फूट रुंद असतील, असा महसूल विभागाचा निर्णय आहे.

# बीडमध्ये पुन्हा थरार! पवनचक्की प्लांटच्या परिसरात गोळीबार

## एकाचा मृत्यू; चोरटे गेट तोडतानाचा सिसीटिव्ही फुटेज समोर

बीड । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसापासून कोणत्या ना कोणत्या कारणामुळे बीड जिल्हा चर्चेत असून अशीच थरारक घटना लिंबागणेश परिसरात गुरुवारी मध्यरात्री घडली आहे. पवनचक्की प्लांटच्या परिसरात सुरक्षारक्षकाने केलेल्या गोळबारात एकाचा मृत्यू झाला असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पवनचक्की प्लांटमधील साहित्याच्या चोरीच्या उद्देशाने काही तरुण आल्यानंतर हा प्रकार घडल्याचे म्हटले जात आहे.**

लिंबागणेश परिसरातील महाजनवाडी येथील एका खासगी पवनचक्की कंपनीच्या मालकीच्या साहित्याची चोरी करण्यासाठी काही अज्ञात चोरटे रात्रीच्या सुमारास घटनास्थळी दाखल झाले होते. सुरक्षारक्षकाने त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवल्यानंतर त्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न करताच, त्याने इशारा देऊन चोरट्यांच्या दिशेने गोळीबार केला. गोळीबार झाल्यानंतर चोरटे घाबरून पळून गेले. तर यात गोळी लागल्याने एकाचा मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्यावर परिसराची पाहणी करून अधिक तपास सुरू केला आहे. दरम्यान या घटनेचा एक सिसीटिव्ही फुटेज व्हायरल झाला असून रात्री चोरटे सदरील पवनचक्की प्लांटचे गेट तोडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसत आहे. मात्र सुरक्षा रक्षकाच्या ही बाब लक्षात येताच त्याने आवाज देताच चोरट्यांनी तेथून पळ काढला असावा, असे म्हटले जात असून ◀◀ पान २ वर

### सुरक्षा रक्षक पोलिसांच्या ताब्यात

ज्या सुरक्षा रक्षकाने गोळीबार केला तो सध्या नेकनूर पोलिसांच्या ताब्यात असून यात आणखी काही सुरक्षा रक्षक आहेत का? याविषयी चौकशी केली जाणार असल्याचे समजते. तसेच आणखी किती आणि कोण चोर होते? हे सुध्दा पोलिसांना शोधावे लागणार आहे.

# वैष्णवीचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात- अजित पवार

## आयजी सुपेकरांनाही दिला इशारा



पुणे । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि वैष्णवी हगवणे हिच्या लग्नात ज्यांच्या हाताने हगवणे कुटुंबीयांना फॉर्च्युनरची चावी देण्यात आली होती त्या अजित पवारांनी वैष्णवीच्या माहेरी जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. आई-वडिलांची भेट घेत संपूर्ण घटना जाणून घेतली. पीडित कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधत भूमिका व तपासाबाबत माहिती दिली. तसेच, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालेल, याचा लवकर निकाल लागेल असेही अजित पवारांनी ◀◀ पान २ वर

## पंकजा मुंडेंचे 'रामटेक' निवासस्थानी कार्यकर्त्यांशी हितगूज

# तुमच्यासाठी जे जे चांगलयं, ते करण्याचा माझा प्रयत्न

### जनसामान्यांची कामं अन् कार्यकर्त्यांना बळ देण्याचं काम रामटेक मधून होईल



मुंबई । प्रतिनिधी

**राजकारण, समाजकारण करत असताना माझ्या संकटात आणि विजयात तुम्ही तेवढेच साक्षीदार आहात. तुमच्यामुळेच मी आज इथपर्यंत पोहोचले आहे, त्यामुळे तुमच्यासाठी जे जे काही चांगलं असेल ते करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. जन सामान्यांची कामं आणि सर्वांना बळ देण्याचं काम 'रामटेक' मधून होईल अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी हितगूज साधलं.**

बीड जिल्हयातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी मुंबईतील ''रामटेक'' या शासकीय निवासस्थानी ना. पंकजाताई मुंडे यांनी एक छोटेखानी कौटुंबिक स्नेहमिलन कार्यक्रम काल आयोजित केला होता, त्यावेळी त्या बोलत होत्या. आई प्रज्ञाताई मुंडे यावेळी आवर्जून उपस्थित होत्या. ना. पंकजाताई मुंडे पुढे बोलताना म्हणाल्या, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब उप मुख्यमंत्री असताना याच रामटेक निवासस्थानी माझं बालपण गेलं, त्यानंतर तब्बल तीस वर्षांनंतर मी या बंगल्यात रहायला आले, याठिकाणी मुंडे साहेबांचा फोटो लागला आणि आपल्या सर्वांचे पांग फिटले. आज माझी ◀◀ पान २ वर

# मंत्री संजय शिरसाट आज बीड जिल्ह्यात

## तिरंगा रॅलीसह विविध कार्यक्रमांना उपस्थिती



बीड । पतिनिधी

भारतमातेच्या विरांच्या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी आणि मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात आज दि. २४ मे २०२५ रोजी सकाळी १०. ०० वाजता देशभक्तीने ओथंबलेली भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली असून या ऐतिहासिक रॅलीस महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ही रॅली भारतरत्न डॉ. बाबासाहेब ◀◀ पान २ वर

### शूरवीर सैनिकांसाठी, चला एक होऊ देशासाठी- जगताप, मुळूक, गलधर

देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी शूरवीर जवान आपल्या प्राणांची आहुती देतात. त्या शूरवीरांना आपण एक सुजाण भारतीय नागरिक असल्या नात्याने एकत्रित येऊन वंदन करायला हवे. ही तिरंगा रॅली आपल्या सैनिकांच्या बलिदानाचे स्मरण आणि त्यांच्या शौर्याची गाथा गाण्याचा एक पवित्र क्षण असणार आहे. यामुळे बीडवासियांनी जास्तीतजास्त संख्येने तिरंगा रॅलीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी तमाम बीडवासियांना केले आहे.



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ मे २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ३८.०० क्विंटल | २,४५० | २,८८२ | २,६२४ |
| ज्वारी/हायब्रिड : ११०.०० क्विंटल | २,१७० | ३,१६१ | २,४४२ |
| मका/लोकलः३३.५०क्विंटल | ५,३०१ | ६,७०० | ६,४१७ |
| तूर : १०.०० क्विंटल | ४,६०० | ६,७०० | ६,३२२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरीः ९५.०० क्विंटल | २,००० | २,६०५ | २,४१६ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीनः १७.५० क्विंटल | ४,००० | ४,३०० | ४,१६६ |
| हरभराः ३.५० क्विंटल | ५,४२५ | ५,७५० | ५,५८७ |

# बीड जिल्ह्याला अवकाळीवेढा; प्रशासनाचे पंचनाम्याचे आदेश

## नुकसान कोट्यावधींचे तरीही शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळेल का?



बीड । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसापासून जिल्ह्यात सर्वच भागात अवकाळीने थैमान घातले असून अक्षरशः जिल्ह्याला अवकाळीने वेढा घातला असल्याचे चित्र आहे. मान्सूनपुर्व पावसाने उन्हाळ पिकांसह फळबागांचेही मोठे नुकसान झाले आहे. तर जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले असल्याचे शेतकऱ्यांना एक प्रकारे हा दिलासा आहे.**

प्रत्येक वर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूनपुर्व पाऊस पडत असतो. त्यानंतर पेरणीपुर्व मशागतीला वेग येत असतो, मात्र यंदा मे महिन्याच्या ◀◀ पान २ वर

### तातडीने पंचनामे करा-मंत्री मकरंद जाधव-पाटील

मुंबई : राज्यात काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले. मंत्री श्री. जाधव-पाटील म्हणाले, नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांप्रती राज्य शासन संवेदनशील आहे. एप्रिल व मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेत पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी. यासाठी शेत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. पंचनामे करण्यासाठी महसूल व कृषी विभागाने पथके गठीत करून ही कार्यवाही गतीने पूर्ण करावी. मंत्री श्री. जाधव - पाटील म्हणाले, अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यास शासन नेहमीच प्राधान्य देत आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी सन २०२३- २०२४ या वर्षात ५४ लाख ८० हजार पात्र शेतकऱ्यांना ४ हजार ८३३ कोटी (चार हजार आठशे तेहतीस कोटी ) रूपये तर २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात ६९ लाख ३ हजार शेतकऱ्यांना ६ हजार ९८९ कोटी ( सहा हजार नऊशे एकोणनव्वद) आणि १ एप्रिल २०२५ ते आतापर्यंत ९ लाख ७ हजार शेतकऱ्यांना ९७५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

cmyk

cmyk



अग्रलेख

# पावसाळी ट्रेलर धडकी भरविणारे

गत काही दिवसांपासून राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. पुढील चार दिवस राज्यात पावसाची अशीच स्थिती राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. गत तीन-चार दिवसांपासून महाराष्ट्रात पावसाने थैमान घातले आहे. पुणे, मुंबई, नाशिक, मराठवाडा, कोकण आणि विदर्भात धो-धो पाऊस पडतो आहे. मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटात पावसाचे बरसणे सुरू आहे. कर्नाटक किनारपट्टीजवळ चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्रात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. गत दोन आठवड्यांपासून राज्यात मान्सूनपूर्व मध्यम सरी आणि मेघगर्जनेसह पाऊस पडत आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत केरळमध्ये मान्सून धडकण्याची शक्यता आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून महाराष्ट्र व्यापणार आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मान्सून तळकोकणात धडकण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

अवकाळी पावसाचा सर्वात मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. उभ्या पिकांवर परिणाम झाला असून भात रोपवाटिका, कांदा, भाजीपाला, आंबा आदींचे मोठे नुकसान झाले आहे. हवामानातील अस्थिरतेमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना आणि विजांच्या कडकडाटामुळे जीवितहानी होण्याच्या घटना घडल्या. एकीकडे अवकाळी पावसामुळे नुकसान तर दुसरीकडे वेळेआधी मान्सून येण्याची शक्यता यामुळे हवामानाच्या अनिश्‍चिततेचे दर्शन घडत आहे. राज्यात जनजीवन विस्कळीत झाले आहे. गत आठ दिवसांपासून वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाचा हैदोस सुरू आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजापेक्षा जास्त पाऊस झाल्याने पेरणी करावी की नाही अशी शेतकऱ्याची द्विधा मन:स्थिती झाली आहे. पेरणीनंतर पिकाची जोमात वाढ व्हावी यासाठी १०० मि.मी. पावसाची गरज असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई करू नये असे आवाहन कृषि विभागाने केले आहे. गत पंधरवड्यात मराठवाड्याला अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे. वीज कोसळून २७ जणांचा मृत्यू झाला असून २१ जण जखमी झाले आहेत. ३९१ जनावरे मरण पावली आहेत. सुमारे ४ हजार हेक्टरहून अधिक शेतीचे नुकसान झाले आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला शेतकऱ्यांनी खरिपासाठी मशागत सुरू केली होती. परंतु ३ मे पासून अचानक अवकाळी पाऊस सुरू झाला. त्यामुळे मशागतीचे काम बंद पडले. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक घरांचे छप्पर उडाले, विजेचे खांब आणि झाडे आडवी झाली. शेतपिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. डाळिंब, केळी, आंबा फळपिकांसह टोमॅटो, कांदे, बाजरी, भुईमूग पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अवकाळी पावसामुळे शेतपिके, फळबागांचे नुकसान होऊन उत्पन्न सरासरीपेक्षा कमी होत आहे.

कोकणात एप्रिलच्या सुरुवातीलाच सलग दोन दिवस पाऊस पडला. त्यामुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा, काजूचे मोठे नुकसान झाले. उन्हाळ्यातील अवकाळी पावसामुळे शहरातील मध्यमवर्ग सुखावत असला तरी शेतकऱ्यांना मात्र मोठा फटका बसतो. अवकाळीचा सर्वाधिक फटका अमरावती जिल्ह्याला बसला. संत्रा, कांदा, ज्वारी, मूग आणि केळी पिकांचे नुकसान झाले. नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील मका, ज्वारी, बाजरी, कांदा केळी यासह अनेक पिकांना फटका बसला.

हवामान बदलामुळे अवकाळीचा तडाखा वाढला आहे. पर्यावरणीय ऱ्हासाचा वेग पाहता २०५० पर्यंत हवामान बदलाचे प्रतिकूल परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहेत. पाण्याचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. देशामध्ये महिलांना जलसंकटाचा सामना सर्वाधिक करावा लागतो. मे महिना महाराष्ट्रात कडक उष्णतामानाचा महिना मानला जातो, परंतु यंदाचा मे महिना अजबच निघाला. मे महिन्यात असा दमदार पाऊस होणे दुर्मिळच. हवामानतज्ज्ञांच्या मते मे महिन्यातील या असामान्य पावसामागे अनेक कारणे आहेत. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याने, जूनच्या सुरुवातीला मान्सूनपूर्व प्रभाव दिसून येतो पण यंदा हवामानात झालेल्या बदलामुळे मान्सूनपूर्व पावसाला लवकर सुरुवात झाली. सध्या एल-निनोचा प्रभाव कमी झाल्याने वातावरणात आर्द्रता वाढून पाऊस शक्य झाला. मानवनिर्मित कारणांमुळे वातावरणातील अस्थिरता वाढली आणि त्यामुळे हवामानात अनपेक्षित बदल, वाढत्या शहरीकरणाचा प्रभाव, जंगलतोड इ. जिथे हवामान कोरडे असते तिथे मे महिन्यातील पाऊस दिलासा देतो मात्र, काही भागात आंबा, केळी, कापूस यासारख्या पिकांना फटका बसतो. पाणी टंचाई असलेल्या भागात हा पाऊस वरदान ठरू शकतो. यंदाचा मे महिना हवामानाच्या दृष्टीने अपवादात्मक ठरला. हा बदल तात्पुरता की कायमचा ते सांगणे कठीण आहे. अशा पावसासाठी जनतेने आणि प्रशासनाने सतर्क राहणे आवश्यक आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांचे मुख्यमंत्र्यांनी रणशिंग फुंकले

## सप्टेबर-ऑक्टोबरमध्ये निवडणुका होण्याचे दिले संकेत

**सांगली। प्रतिनिधी**

**देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले आहे. येत्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात राज्यात जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकेच्या निवडणुका लागतील, त्यामुळे स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका जिंकण्याच्या दृष्टीने ताकतीने काम करा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा कार्यकर्त्यांना केले आहे, ते सांगलीमध्ये आयोजित भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.**

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे यांचे सरकार जेव्हा महाराष्ट्रात आले होते. तेव्हा महाराष्ट्रातील संगळीच कामं थांबली होती, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. तसेच महाराष्ट्राच्या विकासासाठी यापुढे संस्थात्मक बदल करणे गरजेचे आहे, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना म्हटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत बोलताना फडणवीस म्हणाले, सप्टेंबर-ऑक्टोंबरमध्ये निवडणुका लागणार असून सर्वांनी कामाला आतापासूनच लागावे. तसेच दीड महिन्यात या सगळ्याच निवडणुका उरकल्या जातील. जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक एकत्र होईल, असेही ते म्हणाले.

# पृथ्वीच्या दिशेनं येतय प्रचंड वेगाने मोठे संकट

## ..तर होणार हजारो अणूबॉम्ब पेक्षाही जास्त नुकसान, नासाचा इशारा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**सुर्य मालेतील या घटनेमुळे वैज्ञानिक देखील चांगलेच धास्तावले आहेत, वैज्ञानिक या घटनेकडे गांभीर्याने पाहात आहेत. या ॲस्ट्रोइडचे क्षेत्रफळ अंदाजे ३३५ मीटर एवढं आहे, म्हणजे त्याचं आकारमान तब्बल तीन फुटबॉल मैदानाएवढे आहे.**

विचार करा जर आकाशातून प्रचंड वेगाने एखादा महाकाय दगड पृथ्वीच्या दिशेनं येत असेल तर काय होईल? जर हा दगड पृथ्वीला धडकला तर हजारो अणूबॉम्बने देखील जेवढे नुकसान होणार नाही तेवढं पृथ्वीच नुकसान या दुर्घटनेमुळे घडू शकते. ही काही सायंस फिक्शन चित्रपटाची कथा नाही, तर याबाबत नासाकडून देखील इशारा देण्यात आला आहे. २४ मे २०२५ रोजी एक विशाल ॲस्ट्रोइड, ज्याचे नाव २००३ ४ आहे, तो पृथ्वीच्या एकदम जवळून जाणार आहे. यामुळे पृथ्वीचे तसे थेट नुकसान होण्याची शक्यता नाही. मात्र या घटनेमुळे वैज्ञानिक देखील चांगलेच धास्तावले आहेत, वैज्ञानिक या घटनेकडे गांभीर्यानं पाहात आहेत. या ॲस्ट्रोइडचं क्षेत्रफळ अंदाजे ३३५ मीटर एवढं आहे, म्हणजे त्याचं आकारमान तब्बल तीन फुटबॉल मैदानाएवढं आहे. या ॲस्ट्रोइडचा वेग प्रति सेंकद १४ किलोमीटर एवढा प्रचंड आहे. हा ॲस्ट्रोइड अपोलो ग्रुपचा एक भाग आहे. सामान्यपणे अपोलो हा एक दगडांचा समूह आहे, जो पृथ्वीच्या कक्षेला क्रॉस करतो.

### पृथ्वीच्या किती जवळ येणार?

लघुग्रह २००३ ४ हा पृथ्वीपासून ६.६८ मिलियन किलोमीटर अंतरावरून जाणार आहे, ऐकण्यासाठी हे अंतर फार जास्त वाटते. मात्र खगोलशास्त्राच्या भाषेत हे अंतर खूप जवळ मानले जाते. हे अंतर पृथ्वी आणि चंद्रापेक्षा फक्त १७ पट अधिक आहे. याबाबत नासाच्या सेंटर फॉर निअर अर्थ ऑब्जेक्ट स्टडीजने सांगितले सध्या तरी या ॲस्ट्रोइडचा पृथ्वीला फार धोका नाहीये, मात्र जर या ॲस्ट्रोइडच्या गतीमध्ये किंवा दिशेमध्ये काही बदल झाल्यास ही घटना पृथ्वीसाठी धोकेदायक ठरू शकते. याबाबत माहिती देताना शास्त्रांनी सांगितले की, जर एवढा मोठा ॲस्ट्रोइड पृथ्वीला धडकला तर हजार अणू बॉम्ब एवढी ऊर्जा एकाच वेळेस उत्सर्जित करू शकतो. त्यामुळे पृथ्वीचे प्रचंड मोठे नुकसान होईल. हा ॲस्ट्रोइड पृथ्वीला धडकला तर एकाचवेळी प्रचंड प्रमाणात उष्णता, त्सुनामी आणि भूकंप अशी संकटं येतील. यामुळे सुर्याचा प्रकाश देखील अडवला जाऊ शकतो. मात्र सध्या तरी हा लघु ग्रह पृथ्वीला धडकण्याची कोणतीही शक्यता वाटत नसल्याचंही नासाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या लघु ग्रहावर आम्ही लक्ष ठेवून असल्याचेही नासाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# कै.एकनाथराव पा.घुगे यांच्या स्मरणार्थ उद्या हरीकीर्तन,गुणवंत विद्यार्थी व माजी सैनिकांचा सत्कार!

**जालना । प्रतिनिधी**

**शिवसेना नेते,माजी सरपंच, प्रगतशील शेतकरी तथा शासकीय गुत्तेदार कै. एकनाथराव पा. घुगे यांच्या पुण्यतिथी निमित्त रविवारी ( ता.२५) भराडखेडा ता. बदनापूर येथील नाथ कृषी फार्म वर हरीकीर्तन, गुणवंत विद्यार्थी व माजी सैनिकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी दिली.**





सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रबोधनकार, ह. भ .प. विलास महाराज गेजगे ( बीड) यांचे हरिकीर्तन होईल. तद्रंतर विधिमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ.अर्जुनराव खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आ. नारायण कुचे यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थी आणि माजी सैनिकांचा सत्कार सोहळा होणार आहे. यावेळी पंडितराव भुतेकर,अभिमन्यू खोतकर, ए.जे.बोराडे, विष्णू पाचफुले ,फेरोजलाला तांबोळी ,सुनील किनगावकर, आत्मानंद भक्त, कैलास मदन, कल्याणराव अवघड, भगवान मात्रे, संतोष मोहिते, भूषण शर्मा, भालचंद्र भोजने, राजेंद्र लाड ,गणेश सुपारकर, नानासाहेब वानखेडे , विशाल गाढे, दत्तात्रय बंगाळे, कैलास दुधानी, शिवाजी जऱ्हाड आदींची उपस्थिती राहणार असून पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, माजी जि.प .सदस्य भानुदासराव घुगे ,कार्यकारी अभियंता कृष्णा घुगे, माजी नगरसेवक गणेश घुगे, शाखा अभियंता अशोक घुगे, रमेश घुगे, तातेराव घुगे ,नारायण घुगे ,विलास घुगे, राधाकिसन घुगे ,हरिदास घुगे, कैलास पालवे, जगन्नाथ पालवे बाबासाहेब गीते, बाळाभाऊ गीते, मदन गीते, संतोष घुगे, किशोर घुगे, धर्मा घुगे , तेजांस घुगे, सुभाष बारगजे, दिलीप जायभाये ,राजीव वाघ ,सर्जेराव वाघ, संतोष ताठे ,सखाराम जावळे, विलास तुपे, रामेश्वर दराडे , समाधान दराडे ,संतोष मुळक आदींनी केले आहे.

# शेतकऱ्यांची खते व बियाणे साठी लिंकिंग द्वारे होणारी लूट तात्काळ थांबवा - उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

**ऐन खरीपाच्या तोंडावर बीड जिल्ह्यात डीएपी खत व सोयाबीन, कपाशीच्या बियाणांची शेतकऱ्या कडून मागणी वाढताच खात व बियाणे बाजारातून गायब झाले असून यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहे. ऐन पेरणी हंगामात शेतकऱ्यांना वेठीस धरल्यास त्यांना त्यांची जागा दाखवून देऊ असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हंटले आहे.**



एकीकडे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार जिल्ह्यात मुबलक प्रमाणात खते व बियाणे उपलब्ध असल्याचे सांगतात, मग मुबलक प्रमाणात उपलब्ध असताना ते शेतकऱ्यांना का मिळत नाही ? बीड जिल्ह्यात खरीप पेरणी जवळ आली असतानाच डीएपी खताची आवक कमी झाल्याचे सांगत शेतकऱ्यांना डीएपी खतासोबत व कपाशीच्या काही नामांकित बियाणेवर इतर गरज नसलेल्या खताची व बियाणे ची लिंकिंग केल्या जात आहे. यामुळे आधीच नापिकी आणि अवकाळी ने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना जास्तीचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. या बाबतीत शासनाचा कृषी विभाग अजूनही झोपेत असून कृषी विभागाचे भरारी पथक काय करत आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कृषी विभागाच्या साह्याने काही कृषी सेवा केंद्र कृत्रिम टंचाई निर्माण करून चढ्या दराने विक्री करून शेतकऱ्यांना लुटण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे, पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हे होऊ देणार नसुन, कृषी विभागाने यावर तात्काळ कागदी घोडे न नाचवता उपाययोजना करावी व शेतकऱ्यांची लिंकिंग द्वारे होणारी लूट थांबवावी, अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करू असा इशारा जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे.

# गावात पाणी सुरू न झाल्यास कार्यकारी अभियंता व उपअभियंता होणाऱ्या कारवाईस तयार रहा-आ.बबनराव लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

**१७६ गाव वॉटर ग्रीड व ९५ गाव वॉटर बीड मधील गेल्या तीन महिन्यापूर्वी मुंबई येथे झालेल्या सदस्य सचिव यांच्या दालनात झालीय बैठकीमध्ये, प्रत्येक गावात सुरळीत पाणीपुरवठा करण्याची हमी अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता यांनी दिली होती मात्र अद्यापही ते गावांना पाणी देऊ शकलेले नाहीत या प्रश्नावरून आमदार बबनराव लोणीकर हे मेंदू खराब असलेले कार्यकारी अभियंता यांच्यावर चांगलेच संतापले व अल्टीमेटम देत सुरळीत पाणीपुरवठा न झाल्यास होणाऱ्या कारवाईला सामोरे जा असा सज्जड दम यावेळी त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या अधिकाऱ्यांना दिला . ७०० कोटी रुपये खर्च करून आपण मंत्री असताना राज्यातील सर्वात मोठी वॉटर ग्रीड परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये आणली मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या लाचखोर अधिकाऱ्यांमुळे अद्यापही योजनेचे पाणी संपूर्णत मतदारसंघात पोहोचले नसल्याने आमदार बबनराव लोणीकर यांनी अधिकाऱ्यांनी होणाऱ्या परिणामास तयार रहा असा गर्भित इशारा दिला .**

वाळू धोरणाच्या संदर्भामध्ये बोलताना ते म्हणाले की, आपण परतूर मंठा विधानसभा मतदारसंघांमध्ये १५००० च्या वर घरकुल मंजूर केलेली असून त्यात प्रधानमंत्री आवास योजना यशवंतराव चव्हाण घरकुल योजना, अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास योजना, शबरी आवास योजना आधी आवास योजनांचा समावेश असून, या गोरगरीब घरकुलधारकांना घर बांधण्यासाठी वाळू मिळत नव्हती या पार्श्वभूमीवर आपण राज्य सरकारच्या ही गोष्ट लक्षात आणून दिल्यानंतर घरकुलाला मोफत वाळूचे धोरण सरकारने अमलात आणले असून मतदार संघातील घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करून देण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावातील लाभार्थ्यांच्या याद्या तहसीलदारांना सुपूर्द करावात अशीही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले . यावेळी परतूर नगरपालिकेच्या प्रशासनाला धारेवर धरताना, स्वच्छतेच्या प्रश्नावर आक्रमक होत गाव व मों ढा भागात तुंबलेल्या नाल्या , रस्त्यावर आलेले घाण , हे स्वच्छता निरीक्षकांना दिसत नाही काय असावा उपस्थित करीत पावसाळापूर्व नालेसफाई होणे आवश्यक होते मात्र असे न केल्यामुळे शहरातील प्रत्येक भागामध्ये दुर्गंधी पसरलेली असून , शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे या कामा त दिरंगाई करणाऱ्या विभाग प्रमुखावर कारवाई करण्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला. पारधी वाडा परिसर साठे नगरचा काही भाग, वडारवाडी आदी भागांमध्ये गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्यास असणाऱ्या गोरगरीब नागरिकांना घरपट्टी पाणीपट्टी भरूनही काबीज जमिनीवर घरकुलाचा लाभ मिळालेला नसून या संदर्भामध्ये मुख्याधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करत या गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांना घरकुलाचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी असे यावेळी मुख्य अधिकाऱ्यांना आदेशित केले. गुंठेवारीचा प्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी येत्या चार दिवसांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बैठक लावणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर श्री शताब्दी वर्षानिमित्त ग्रामीण भागातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत दोन महिलांना सन्मानित करण्यासाठी सामाजिक राजकीय शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची निवड केली जाणार असून निवड झालेल्या महिलांना परतूर येथे प्रशस्तीपत्र व पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचेही यावेळी त्यांनी नमूद केले. यावेळी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार डॉ प्रतिभा गोरे, मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे, मजीप्रा चे कार्यकारी अभियंता श्री चव्हाण मंठा परतूर चे गटविकास अधिकारी राजेश तांगडे, जालना गटविकास अधिकारी संदीप पवार महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री कोळेकर, लोकप्रतिनिधी यांच्यासह प्रशासनातील विविध विभागांच्या विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

पान १ वरून...

### यंदा मान्सून लवकर; शेतातील

वर्तवलेल्या अंदाजानुसार यंदा मान्सून वेळे आधीच रविवारी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार सध्या मान्सूनसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे येत्या २५ मे पर्यंत मान्सून हा केरळच्या किनारपट्टीवर दाखल होऊ शकतो. गेल्या वर्षी ३० मार्च रोजी मान्सूनची केरळमध्ये एन्ट्री झाली होती. मात्र यंदा वेळेपूर्वीच म्हणजे २५ तारखेला मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २००९ साली केरळमध्ये वेळेआधी मान्सून दाखल झाला होता, त्यानंतर आता तब्बल १६ वर्षांनी वेळेपूर्वीच मान्सून केरळमध्ये दाखल होणार आहे. येत्या २५ मे पर्यंत मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे, त्यानंतर पुढील काही दिवसांमध्ये मान्सूनची एन्ट्री दक्षिण भारत आणि मध्य भारतात होणार आहे, मात्र याच दरम्यान दक्षिण कोकण आणि गोव्याच्या समुद्र किनाऱ्यावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. याचा परिणाम म्हणजे सध्या महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जोरदार अवकाळी पाऊस सुरू आहे. पुढील छत्तीस तास महत्त्वाचे असून, आयएमडीकडून राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या अवकाळी पावसाचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे, फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे, तर दुसरीकडे नागरिकांना वाढत्या उष्णतेपासून दिलासा देखील मिळाला आहे.

------------

### वैष्णवीचा खटला फास्ट

सांगितले. तर, वैष्णवीचे मामासासरे असलेल्या पोलीस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनाही अजित पवारांनी स्पष्ट शब्दात इशारा दिला आहे. शुक्रवारी सकाळी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी कस्पटे कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वैष्णवीच्या आई-वडिलांची भेट घेऊन सांत्वन केले. त्यानंतर, माध्यमांशी संवाद साधताना, याप्रकरणी कोणाचीही हयगय केली जाणार नाही, राजकीय हस्तक्षेप होणार नाही असे अजित पवारांनी म्हटले. घटनेची माहिती मिळताच, मी पिंपरी चिंचवडचे आयुक्त चोबे यांना आदेश दिले होते. कोणाची हयगय करायची नाही, राजकीय हस्तक्षेप होणार नाही. आरोपींना तातडीने बेड्या ठोकण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, तिघांना आधीच अटक केली होती, सासरे आणि दिराला आज बेड्या ठोकल्या आहेत. मग मी कस्पटे कुटुंबीयांशी वैयक्तिक बोललो. तपास करणाऱ्या सर्वांना इथेच बोलावले. तसेच, बाळ ज्यांच्याकडे होते त्या निलेश चव्हाणवरही कडक कारवाईचे आदेश दिले आहेत, अशी माहिती अजित पवारांनी दिली. आरोपी फोन आणि गाडी वारंवार बदलत होता, मात्र पोलिसांनी जुळवाजुळव करुन चांगली कारवाई केली. आता न्यायालयातही त्यांना कठोर शिक्षा होईल, त्याअनुषंगाने पावले उचलायला सांगितले आहेत. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालेल, तातडीने निकाल लागेल. कारण, ही अतिशय वेदनादायक घटना आहे, असेही अजित पवारांनी स्पष्ट केले. तुमच्या-माझ्या घरातील केस असती तर चव्हाट्यावर ही केस आणली नसती. तपास योग्य सुरु आहे, असे कस्पटे कुटुंब म्हणाले. प्रत्येक गोष्टीची शहानिशा केली जाईल. पत्रकारांना वकीलापेक्षा जास्त ज्ञान आहे, हत्येचा गुन्हा दाखल केला आणि पुरावे नसतील तर केस स्ट्राँग राहणार नाही. त्यामुळे पुराव्यांच्या आधारे हे प्रकरण हाताळले जात आहे. शेवटी न्यायालयात प्रकरण टिकायला हवे. जालिंदर सुपेकर यांच्याशी मी बोललो. त्यांना सांगितले प्रकरण संवेदनशील आहे, तुमच्याबाबत दबक्या आवाजात बोलले जात आहे, पण, तपासात फोनचे कनेक्शन आढळले तर कारवाई केली जाईल, असेही अजित पवारांनी म्हटलें.

**हगवणे पिता-पुत्राला २८ मेपर्यंत पोलीस कोठडी**

वैष्णवी हगवणे आत्महत्याप्रकरणात फरार आरोपी राजेंद्र हगवणे आणि त्यांचा मुलगा शशांक हगवणे यांस पोलिसांनी पहाटेच्या सुमारास अटक केली. या अटकेनंतर त्यांना न्यायालयात हजर केले असता, २८ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दुसरीकडे राजकीय वर्तुळातही या घटनेवरुन संताप व्यक्त होत असून भाजपच्या महिलांनी कोर्टाबाहेर आंदोलन करत, आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

**आरोपींवर 'मोक्का' लावण्याची वैष्णवीच्या वडलांची मागणी**

वैष्णवी हगवणेच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी राजेंद्र व सुशील हगवणे या दोघांना अटक केल्यानंतर वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे आणि काका मोहन कस्पटे यांनी आरोपीची कसून चौकशी झाली पाहिजे आणि त्याच्यावर 'मोका'सारखा कठोर कायदा लावला गेला पाहिजे. अशी मागणी केली आहे. अशा निर्दयी माणसांना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे. या संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

------------

### बीडमध्ये पुन्हा थरार!

त्यानंतर सुरक्षा रक्षकाने चोरट्याच्या दिशेने गोळीबार केल्यावर त्यातील एक गोळी एका चोरट्याला लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

----------

### मंसंजय शिरसाट आज

आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सुरू होईल. त्यानंतर सुभाष रोड मार्गे जात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करण्यात येणार आहे. शेवटी सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली वाहून रॅलीचा समारोप होईल. या रॅलीमध्ये हजारो तरुण मोटारसायकलवर तिरंगा झेंडा हाती घेऊन सहभागी होणार आहेत. हे आयोजन केवळ एक कार्यक्रम नसून, जवानांच्या शौर्याला मानवंदना देणारी आणि एकतेची भावना जागवणारी लोकचळवळ ठरणार आहे.

-------------

### तुमच्यासाठी जे जे चांगलयं, ते

आई इथे उपस्थित आहे, प्रत्येक आईला आपली मुलगी मोठी व्हावी असे वाटते. आपली मुलगी सर्वांच्या भल्यासाठी काम करत आहे असा विश्वास तीला आहे.

**सर्वांना बळ देऊ**

राजकारणात काम करत असताना आतापर्यंत अनेक चढ उतार अनुभवले. कटू प्रसंगानंतर गोड अनुभव देखील आले. सर्व काळात तुमचा पाठिंबा आणि साथ मला लाभली. माझ्या जिल्हयातील कार्यकर्ता स्वाभिमानी आहे. तुमच्यासाठी जे जे चांगले आहे, ते करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. या बंगल्यातून सर्वांना बळ देण्याचे काम होईल. नाव माझे असले तरी बंगला तुमचा आहे, त्यामुळे तुमच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी मी कटिबध्द आहे असं ना. पंकजाताई म्हणाल्या. आ. नमिताताई मुंदडा, माजी आमदार आर टी देशमुख, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, रमेश कराड, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष मकरंद पत्की, राजेश्वर देशमुख, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ज्येष्ठ नेते श्रीहरी मुंडे, राजेश देशमुख, शिवाजीराव गुट्टे, जिल्ह्यातील सर्व सर्व आजी माजी तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, मंडल अध्यक्ष, बँकेचे संचालक, सरपंच, लोकप्रतिनिधींसह पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

---------------

### बीड जिल्ह्याला अवकाळीवेढा;

मध्यानंतरच बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाने थैमान घातले असून मशागतीची कामे थांबली आहेत. तर उन्हाळ पिके, भाजीपाला, फळभागांचे मोठे नुकसान झाले आहे. यात शेतकऱ्यांना कोट्यावधी रुपयांचा भुर्दंड सोसावा लागणार असून तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी मागणी होत आहे. दरम्यान अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे वेळेत पंचनामे झाल्यावर त्याचा अहवाल शासनास लवकर गेला तर शेतकऱ्यांना मदतही वेळेत मिळेल.

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. २४ मे २०२५



## आशियायी स्क्वॉश क्रीडा स्पर्धेसाठी वसुंधरा नांगरेची भारताच्या संघाकडून निवड

कळंब । प्रतिनिधी



चेन्नई येथे झालेल्या आशियाई निवड स्पर्धेत वसुंधरा मुकुंद नांगरे हिने १५ वर्ष वयोगटात देशात तिसरा क्रमांक मिळवून आशियाई स्पर्धेतील आपलं स्थान पक्कं केलं . जुलै महिन्यात दक्षिण कोरिया देशात होणाऱ्या आशियाई ज्युनिअर स्पर्धेसाठी वसुंधराची भारताच्या संघात निवड झाली आहे. कळंबसारख्या ग्रामीण भागातील खेळाडूच्या देशाच्या संघात खेळणी ही एक अभिमानाची गोष्ट आहे. सातत्याने सराव अनेक स्पर्धेच्या अनुभव जिद्द ,चिकाटी, मेहनत वसुंधराला भारतीय संघात निवडीसाठी फायद्याचे ठरले. कळंबच्या शिवछत्रपती क्वॉश अकॅडमी करणाऱ्या वसुंधरा मुंबईत खार जिमखाना येथे आंतरराष्ट्रीय कोच अभिनव सिन्हा, रवींद्र नवले ,कांगा ,नवल खंडवाल ,चेतन देसाई ,करण गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. वसुंधराला राजेभाऊ शिंदे, मुकुंद नांगरे , अनिल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले या निवडीबद्दल वसुंधराचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.स्क्वॉश या मुंबई ,दिल्ली, चेन्नई, कोलकाता अशा महानगरामध्ये खेळल्या जाणाऱ्या खेळांमध्ये प्राविण्य एका कळंब सारख्या ग्रामीण भागात राहणाऱ्या दाखवून भारताच्या संघात निवड करणे एवढे सोपे नव्हते, पण ते शक्य केले आहे.वसुंधराची आई- वडिलांचा पाठिंबा कामी आला आहे. त्या वसुंधरासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी पूर्तता केल्या सतत तिच्या पाठीशी उभे राहिले. या अगोदरची तिने शालेय स्पर्धेत महाराष्ट्राकडून खेळताना शालेय राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले होते. या निवडीबद्दल जिल्हा स्क्वॉश संघटनेचे सचिव महेश राजेनिंबाळकर व अध्यक्ष प्रदीप खांडरे ,जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे आदी ने केले अभिनंदन.

## दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीनेच प्रसिद्ध आहे- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा कलाकारांची भूमी असून या जिल्ह्यात अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्यातून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवलेला आहे काही दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने देखील प्रसिद्ध आहे. कचरवाडी सारख्या डोंगर कुशीत जन्मलेल्या एका तरुणाने चित्रपट क्षेत्रात भरभरून यश मिळवले असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

बीड जिल्ह्यातील कचरवाडी येथील रहिवासी असलेल्या डॉ.महेशकुमार वनवे यांच्या वामा लढाई सन्मानाची या चित्रपटाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते तनिष्का चित्रपटगृहात करण्यात आले. यावेळी आ.विजयराजे पंडित, माजी आ.बदामराव पंडित, ॲड.उषाताई दराडे, सुभाष सारडा, अनिल जगताप, विनोद मुळूक, ज्योतीताई मेटे, अरुण डाके, विलास बडगे, सुधाकर मिसाळ, नितीन धांडे, संगीता धसे, नवनाथ शिराळे, अभय कोटेचा, गौतम खटोड, शुभम धूत, सुहास पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी ज्ञानेश्वर वनवे आणि लोकाशा च्या वतीने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकाशाचे संपादक विजय बंब



यांनी केले तर डॉ.महेशकुमार वनवे यांनी मनोगत व्यक्त करताना आतापर्यंत भोजपुरी सिनेमात काम केले पण मराठी चित्रपट म्हणून आज प्रथमच पदार्पण करत आहे. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खूप मोठे सहकार्य मला लाभले असून मी मुंबईत गेलो तेव्हा तिथे अण्णांनीच मला आधार दिला माझ्या या यशाच्या मागे माझ्या घरातून पाठबळ असून यापुढे मराठी चित्रपट निर्मितीवर आपला भर असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, शुक्रवारी वामा लढाई सन्मानाची हा चित्रपट रिलीज झाला आहे राज्यात एकाच वेळी शेकडो थिएटर मधून हा चित्रपट रिलीज होतोय ही लोकांच्या शुभेच्छांची मोहर आहे. महेश वनवे यांनी जेव्हा मुंबईत प्रवेश केला तेव्हाच मी म्हणालो होतो काळजी करू नकोस, कचरवाडीच्या डोंगर रांगेच्या कुशीत जन्मलेल्या महेश याने कॅलिफोर्निया पर्यंत मजल मारली आहे. भोजपुरी लोकांचा पसंतीचा हिरो म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते दुर्दैवाने माणुसकीला काळीमा लागेल अशा घटना घडत आहेत पण बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने कितीतरी पटीने पुढे आहे. विजय बंब सारखे पडद्यामागचे कलाकार पाठीशी आहेत बीड जिल्हा विविधतेने नटलेला जिल्हा आहे, स्त्री-पुरुष हा भेद आता राहिला नाही वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा याप्रमाणे पंढरीच्या विठ्ठलाने देखील स्वतः आपल्या बाजूला रखुमाईला उभे केले आहे. म्हणजेच भक्ती आणि शक्ती सोबत घेऊनच त्यांनी भक्तांचा सागर आपल्याकडे वळवला आहे. स्त्री शक्तीचा अनुभव म्हणून सुनीता विल्यम सारखी भारतीय वंशाची अंतराळवीर नऊ दिवसासांठी अंतराळ स्थानकावर गेली होती परंतु नऊ महिने संघर्ष करून तिने पृथ्वीवर प्रवेश केला यावरूनच स्त्रीशक्तीचा अंदाज आपण लक्षात घ्यायला हवा. या चित्रपटाचे कथानक स्त्री शक्तीवर अवलंबून असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हान त्यांनी केले. यावेळी चित्रपट रिलीज झाल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी देखील अर्धा तास चित्रपटाचे परीक्षण केले.

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### कर्मवीर ॲड.एकनाथराव आवाड

सेवाभावी संस्था, केज) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अंबाजोगाई येथे आज शनिवार, दि.२४ मे रोजी दुपारी २ वाजता स्व.विलासरावजी देशमुख नगरपरिषद सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी या कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन युवा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष व आयोजक अशोक पालके, नकेश कांबळे, धीमंत राष्ट्रपाल, हनुमंत गायकवाड, अविनाश हजारे, नवनाथ हारे, अक्षय भुंबे, नितीन वाघमारे, दत्ता पालके, हनुमंत रणदिवे, बळीराम उपाडे, रेखा सरवदे, महेश जोगदंड, विजय कांबळे, दशरथ कांबळे, दिपक पालके, राम जोगदंड, प्रशांत भालेराव, प्रदीप कांबळे, सुंदर खाडे, दिलीप पालके, अरूण शिंदे, किशोर वाघमारे, मारूती मस्के, काशिनाथ कांबळे, अशोक आगळे, बाळासाहेब हारे, रानबा गव्हाणे आदींनी केले आहे.

### अमृतच्या रांगोळी व निबंध

गटासाठी प्रथम क्रमांक ₹२०००, द्वितीय ₹१५००, आणि तृतीय क्रमांक ₹१००० अशी आकर्षक रोख पारितोषिके निश्चित करण्यात आली आहेत. स्वा.सावरकर जयंतीदिनी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव व बक्षीस वितरण होणार आहे. या उपक्रमाला डॉ. (सौ.) सीमाताई जोशी व सुनंदाताई कुलकर्णी यांनी विशेष भेट देऊन प्रोत्साहन दिले.या यशस्वी आयोजनात जनशिक्षण संस्थानचे मा. संचालक श्री. गंगाधर देशमुख, अमृतचे जिल्हा व्यवस्थापक श्री. विशाल जोशी, सौ. सुमेधा मनसबदार, श्री. दिगंबर जोशी, श्री. सुमित धिरडे, जनशिक्षण संस्थानचे सर्व कार्यकर्ते यांचे विशेष योगदान लाभले.

### अवकाळी पावसाने टरबुज

केलेला खर्च देखील निघणे मुश्किल झाले आहे. नगदी पीक म्हणून शेतकऱ्यांनी केलेल्या टरबूज फळ पिकास अवकाळी पावसाने फटका दिल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

मी सव्वा एकर क्षेत्रामध्ये टरबुजाची लागवड केली आहे. मे महिन्यात टरबूजला चांगला दर मिळेल या अपेक्षेने टरबूज लागवड केली होती. टरबूज देखील चांगले आले आहेत. सतत पाऊस सुरू असल्यामुळे टरबूज जागेवरच नासून जात आहे. केलेला खर्च देखील निघणे अवघड झाले आहे. शासनाने पंचनामे करून आम्हाला मदत करावी.

गोपीचंद देशमुख शेतकरी देवळा ता.अंबाजोगाई

### शिवाजीनगर पोलीसांनी

तसेच सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान यातील आरोपी क्र. १) अभिषेक शेषेराव काशीद वय २५ वर्षे रा. चक्रधर नगर, बीड याने शिवाजीनगर पोलीस ठाणे गुरनं. ३०६/२०२४ कलम ३०५ बी.एन.एस.प्रमाणे गुन्ह्याची कबुली देवुन त्याने दाखल गुन्ह्यातील गेला मोबाईल रेड मी ७ प्रो. कंपनीचा किं.अं. ७,०००/- रु. असा तपासादरम्यान काढुन दिल्याने तो गुन्ह्याचे तपासकामी जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित काँवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, यांचे मार्गदर्शनाखाली तसेच शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. मारुती खेडकर, पोह/१६६४ आर.जी. आघाव, पोह/४५४ सोनवणे, पोह/५०३ गायकवाड, मपोना/१८३८ चांदणे, पोशि/९८३ सारणीकर, पोशि/५११ सानप, पोशि/२०७७ रहाडे, पोशि/४८७ येवले व पोशि/४८५ कांदे यांनी केली आहे.

## अंबड तालुक्यात ८७ हजार हेक्टर खरीप पेरणीचे नियोजन पूर्ण

### शेतकऱ्यांनी बियाणे व खते घेतांना पक्की पावती घ्यावी -कृषी अधिकारी गंडे

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यात कापूस ५५००० हेक्टर व सोयाबीन १८००० हेक्टर व इतर पिके १४००० हेक्टर क्षेत्रावर पेरणी होण्याचा अंदाज आहे.आणि त्याप्रमाणे मुबलक प्रमाणात खते व बियाणे उपलब्धतेसाठी कृषी विभागानी नियोजन केले आहे,परंतु शेतकऱ्यांनी बियाणे मध्ये विशिष्ट वानाचा व खतामध्ये विशिष्ट ग्रेडचा आग्रह करू नये. बियाणे व खते खरेदी करताना शेतकऱ्यांनी विशेष खबरदारी बाळगावी.बियाणे व खते अधिकृत परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावीत, बियाणे व खते खरेदी करताना विक्रेत्याकडून पक्की पावती घ्यावी, पावतीवर बियाण्याचा व खताचा प्रकार, किंमत, लॉट नंबर, खरेदीची तारीख, विक्रेत्याची सही असल्याची खात्री करावी, बियाण्याच्या पाकिटावर



उत्पादनाची तारीख आणि उगवण क्षमता ( ) तपासा. शक्य असल्यास राष्ट्रीय किंवा राज्य स्तरावर प्रमाणित केलेले बियाणे खरेदी करा. या बियाण्यांची उगवण क्षमता चांगली असते.पेरणी करण्यापूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासा.खताचे पॅकिंग व्यवस्थित सील केलेले आहे का आणि त्यात भेसळ नाही याची खात्री करा. खताचे रंग आणि कण एकसारखे आहेत का ते पाहा.आपल्या शेतातील माती परीक्षण अहवालानुसार आवश्यक पोषक तत्वे असलेली खतेच खरेदी करावीत. अनावश्यक खतांचा वापर टाळावा.खताच्या पाकिटावरील वापराच्या सूचना, प्रमाण आणि घ्यावयाची काळजी याबद्दल माहिती वाचा आणि त्याचे पालन करा. खत बियाण्यांची साठवणूक ओलसर जागी करू नये.

#### कृषी विभागाकडून भरारी पथकाची स्थापना

शेतकऱ्यांची बियाणे खते खरेदी करताना फसवणूक होऊ नये यासाठी नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी विभागाकडून जिल्हा व तालुका पातळीवर भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे,पथकाकडून कृषी सेवा केंद्राची तपासणी केली जात असून बियाणे खते उपलब्ध साठा, विक्री यावर बारकाईने निरीक्षण केले जात आहे. सध्या शेतकऱ्यांनी बियाणी खरेदी सुरुवात केलेली आहे. तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्र धारकांची तालुकास्तरावर कार्यशाळा घेऊन त्यांना मार्गदर्शन व सूचना दिलेल्या आहेत.

#### अडचणी संदर्भात कृषी विभागाचे संपर्क साधावा

बियाणे व खते खरेदी करताना शेतकऱ्यांना अडचण आल्यास किंवा फसगत वाटली तर कृषी विभागाचे संपर्क साधावा, खरेदी करताना विक्रेता संपूर्ण विवरण सहित बिल देत नसेल, छापील किमतीपेक्षा ,मुदत बाह्य किंवा अनधिकृत बियाण्याची खताची विक्री करीत असेल तर तात्काळ तालुका कृषी अधिकारी कार्यालय अथवा कृषी अधिकारी पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

#### पेरणी योग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये

खरिपाची पेरणी ८०-१०० मिमी पाऊस झाल्यावरच करावी, कापूस पिकामध्ये गुलाबी बोंड आळी नियंत्रणासाठी व पिकाची जोमदार वाढ होण्यासाठी पेरणी योग्य पाऊस झाल्यावरच जून महिन्यात लागवड करावी.

## केज येथील आयडीबीआय बँकेला महिला ग्राहकांचे वावडे : पासबुकसाठी दिवसभर ठेवले वेटिंगवर

**सारणी । दिनकर जाधव**

**केज येथील आयडीबीय बँकेतील कर्मचार्यांच्या निष्क्रियतेमुळे माहिला ग्राहकाला केवळ पासबुकसाठी दिवसभर बँकेच्या दारात उभे केले. यामुळे ग्राहकांमध्ये तिव्र असंतोष पहायला मिळत असून बकेच्या कर्मचाऱ्यांविषयी रोष निर्माण होत आहे.**

सरकारी बँक म्हटले की अधिक ग्राहकांचा विश्वास या बँकांवर असतो. कारण खासगी बँकांचा बीड जिल्ह्यातील ग्राहकांना फार बिकट आणि वाईट अनुभव आलेला आहे. त्यामुळे महिला असो की पुरुष असे सर्व ग्राहक आता सरकारी बँककडे अधिक पसंती देतात. त्यामुळे अधिकाधिक ग्राहक या बँकांना मिळत असताना येथील काही बँकेतील निष्क्रिय कर्मचाऱ्यांच्या वर्तनामुळे पुरुष ग्राहकांना तर वेटिस धरले जातच होते. परंतु आता महिला ग्राहकांनाही शुल्लक कारणावरून दिवसभर वेटिंग वर नव्हे तर या एक तासाने, या दोन तासाने असे करीत दिवस त्यांना बँकेत चकरा माराव्या लागत असल्याचे प्रकार आता घडताना दिसत आहेत. असाच प्रकार केज येथील कळंब रोडवर असलेल्या आय डी बी आय बँकेतील कर्मचाऱ्यांनी महिला ग्राहकाबरोबर केलेला समोर आला आहे कारण या बँकेला केज तालुक्यातील सारणी सांगवी हे ही




गाव दत्तक असल्यामुळे येथील ग्राहक या बँकेला जास्त आहेत. कारण दत्तक असलेले बँक त्या गावातील कधीकधी खाते त्या बँकेत असतात. असाच निष्क्रिय तेचा कळस असणारा प्रकार या ग्राहकांना अनुभवाला कारण दि. १९ मे रोजी येथील महिला बँकेत खाते काढण्यासाठी गेल्या खाते ऑनलाईन खाते लवकरात लवकर दिले परंतु पासबुक घेण्यासाठी ज्यावेळेस हीच महिला २३ मे रोजी १२: ३० ते १ ते या दरम्यान बँकेत गेली, त्यावेळी मात्र येथील कर्मचाऱ्यांनी महिला दिवसभर बँकेत कसे थांबेल याचीही त्यांना थोडीशी लाज, शरम वाटली नाही आणि या महिलेला थेट साडेचार वाजता बँकेत येण्यास सांगितले. दोन तास बँकेत थांबून ही नंतर तुम्ही साडेचार वाजता बँकेत या असे सांगितले त्यामुळे या महिलेला नाविलाजास्तव ४:३० वाजेपर्यंत बँकेच्या दारात थांबावे लागले आणि साडेचार वाजता या महिन्याला पासबुक देण्यात आले. अशा नालायक निष्क्रिय कर्मचाऱ्यांमुळे केवळ पासबुक साठी या बँकेत च्या दारात दिवसभर थांबावे लागले त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी या महिलेसह अनेक ग्राहकांनी केली आहे.

**आम्ही दोघी पासबुक साठी १२:३० ते १ वा. दरम्यान बकेत गेलो होतोत. बकेत आम्ही बराच वेळ थांबल्यानंतर आम्हाला थेट ४:३० वा. बोलावले. आम्ही केवळ पासबुक साठी केजला आलो असल्यामुळे आम्हाला नाविलाजास्तव बँकेच्या बाहेर जावे लागले.**
**-- एस.डी.जाधव, ग्राहक**

## ना. पंकजाताई मुंडेंचा एक फोन अन् भुसावळला बदली झालेले कर्मचारी परत परळीला रुजू

### थर्मलमधील त्या कर्मचाऱ्यांनी मानले ना. पंकजाताईंचे आभार!

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या एका फोनमुळे काही दिवसापूर्वी परळी औष्णिक वीज केंद्रातून भुसावळ येथे बदली झालेल्या तंत्रज्ञ पदावरील कर्मचारी पुन्हा परळी येथे रूजू झाले आहेत. बदली रद्द झाल्याने आनंदित झालेल्या या कर्मचाऱ्यांनी ना. पंकजाताईंची मुंबईत प्रत्यक्ष भेट घेऊन आभार मानले आहेत.**

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील तंत्रज्ञ २ व तंत्रज्ञ ३ या पदावर कार्यरत असणाऱ्या काही कर्मचाऱ्यांच्या काही दिवसापूर्वी भुसावळ येथे बदल्या झाल्या होत्या. कुटुंबापासून दूर ठिकाणी बदल्या झाल्याने कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय वेगवेगळ्या कौटुंबिक अडचणीमुळे परेशान झाले होते.



बदली रद्द व्हावी यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले पण यश न आल्याने अखेर त्यांना भुसावळ येथे जॉईन व्हावे लागले होते. हया सर्व कर्मचाऱ्यांनी मध्यंतरी ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन आम्हाला पुन्हा परळीत आणावे अशी विनंती केली होती. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाच्या कौटुंबिक अडचणीची दखल घेऊन वीज निर्मिती कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना एक फोन केला आणि सर्वांच्या पुन्हा भुसावळ येथून परळी औष्णिक वीज केंद्रात बदल्या झाल्या.

भुसावळ येथून परत परळीला बदली झाल्याने तंत्रज्ञ २ चे कर्मचारी अविनाश पवार, संतोष ठोकळ, संतोष मुंडे तसेच तंत्रज्ञ ३ चे परमेश्वर बीडगर, गोविंद शेप, संपत बळवंत, गजानन गिते, मंचक फड, शिवाजी बीडगर, गोरखनाथ खाटिक, नागनाथ मुंडे, कृष्णा मुंडे, मदन फड, अरूण फड यांना ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत.

**मे. विक्री अधिकारी यांचे कार्यालय,**
**व्दारा खोलेश्वर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., दिंद्रुड**
**मेन रोड, प्लॉट नं. १७८८, मु. पोस्ट दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड पिन ४३११२८**
**मो.नं. ९६६५८००१५७/९१३०५३८२२२**

### जाहीर लिलाव पूर्ण अंतिम नोटीस

जावक क्र. ५०/२०२४-२५ दिनांक : २२/०५/२०२५

तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, खोलेश्वर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., दिंद्रुड चे परिशिष्टातील थकबाकीदार यांचे थकीत कर्जाच्या वसुलीकरीता त्यांच्या समोर नमूद केलेल्या वर्णनाची स्थावर मालमत्ता दि. मल्टी-स्टेट को-ऑप सोसायटी अॅक्ट २००२ कलम ९७ व नियमातील तरतुदीनुसार जप्त करण्यात आलेल्या आहेत. सदर जप्तीची नोंद महसूल अधिनियम कायद्यातील तरतुदीनुसार थकबाकीदाराच्या स्थावर मालमत्तेवर, सक्षम अधिकाऱ्यांने जप्तीची नोंद प्रमाणित केलेली आहे. मे. विक्री अधिकारी, हे पोलीस संरक्षणात कोष्टकातील नमूद तारखेस ताबा घेण्यासाठी प्रत्यक्ष स्थावर मालमत्ता स्थळी येणार आहेत. सदर दिवशी तुम्ही स्वतः हजर राहून ताबा कार्यवाही पूर्ण करावी. तरी कोणीही परिशिष्टातील स्थावर मालमत्तेचा खरेदी, विक्री, खाजगी हस्तांतरण, तबदील, देणगी, दाण, बक्षीस, खाजगी कराराने हस्तांतरण, कुलमुखत्यार, इ. कोणताही व्यवहार करू नये. तसे केल्यास तो व्यवहार खोलेश्वर मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., दिंद्रुड वर बंधनकारक राहणार नाही.

**-: कोष्टक :-**

| लवाद क्र. दिनांक | खाते क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | स्थावर जप्त केलेल्या मिळकतदाराचे नाव पत्ता | जप्त केलेल्या मिळकतीचे वर्णन | दि.३०/०४/२०२५ अखेर येणे बाकी | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १७२/२०२४ ०७/०५/२०२४ | ६०२/२३२ | श्री.धर्मराज बळीराम बोरचाटे मु.पो.नित्रुड ता.माजलगाव जि.बीड | श्री.धर्मराज बळीराम बोरचाटे मु.पो.नित्रुड ता.माजलगाव जि.बीड | गाव-तेलगाव ता.धारूर जि.बीड गट क्र.२५६, ० हे ८० आर | २८,६८,००७/- | २४/०७/२०२५ |
| १७२/२०२४ ०७/०५/२०२४ | ६०२/२३२ | श्री.धर्मराज बोरचाटे मु.पो.नित्रुड ता.माजलगाव जि.बीड | सौ.नंदिनी धर्मराज बोरचाटे मु.पो.नित्रुड ता.माजलगाव जि.बीड | गाव-तेलगाव ता.धारूर जि.बीड गट क्र.२५६ १ हे.आर ४२ | २८,६८,००७/- | २४/०७/२०२५ |
| १७६/२०२४ ०७/०५/२०२४ | ६०२/५६ | श्री.गोपाळ लाला राठोड मु.जामगा तांडा पो.तालखेड ता.माजलगाव जि.बीड | श्री.गोपाळ लाला राठोड मु.जामगा तांडा पो.तालखेड ता.माजलगाव जि.बीड | गाव-तालखेड ता.माजलगाव जि.बीड गट क्र.५१७, ० हे ८२ आर गट क्र.५२८, ० हे.०२ आर | १५,०८,९०१/- | २५/०७/२०२५ |
| ०२/२०१९ २४/०२/२०२० | ३८८/२५ | श्री.गोरक्षनाथ कोंडीबा काळे मु.पो.कौडगाव बु.ता.वडवणी जि.बीड | श्री.मधुकर रामराव बादाडे मु.पो.काडीवडगाव ता.वडवणी जि.बीड | गाव-काडीवडगाव ता.वडवणी जि.बीड गट क्र.६०/८, ० हे ०४ आर गट क्र.६१/२, १ हे.३७ आर | ७,६०,४५१/- | २६/०७/२०२५ |
| २६/२०१९ २४/०२/२०२० | ३८८/२२ | बाबुराव दादाराव माने (मयत) वारस उषा बाबुराव माने रा.मु.भीमनगर गेवराई ता.गेवराई जि.बीड | श्री.मधुकर रामराव बादाडे मु.पो.काडीवडगाव ता.वडवणी जि.बीड | गाव-काडीवडगाव ता.वडवणी जि.बीड गट क्र.६०/८, ० हे ०४ आर गट क्र.६१/२, १ हे.३७ आर | ३,३०,३१५/- | २६/०७/२०२५ |
| १७१/२०२४ १०/०९/२०२४ | ६०२/१०८ | श्री.सुदीप संपत आरे मु.पो.चिंचाळा ता.वडवणी जि.बीड | श्री.सुदीप संपत आरे मु.पो.चिंचाळा ता.वडवणी जि.बीड | गाव-चिंचाळा ता.वडवणी जि.बीड गट क्र.१२८, ० हे ४८ आर गट क्र.१४६, १ हे २५ आर | १९,५७,८३९/- | २७/०७/२०२५ |

वरील सर्व थकबाकीदारांनी ही नोटीस मिळाल्यापासून तीस (३०) दिवसाच्या आत नमूद कर्ज खात्याला पूर्ण येणे बाकी भरून कायदेशीर कटू कार्यवाही टाळावी. अन्यथा थकीबाकीदाराची जप्त केलेली मालमत्ता त्वरित जाहीर लिलावाने विक्री केली जाईल याची नोंद घ्यावी.

**स्थळ :- दिंद्रुड**
**दिनांक :- २२/०५/२०२५**

**विक्री अधिकारी**
**व्दारा खोलेश्वर मल्टीस्टेट को-ऑप क्रे. सोसायटी लि., दिंद्रुड सहकार मंत्रालय, सहकार संस्थेचे केंद्रीय निबंधक, न्यू दिल्ली, यांनी बहुराज्यीय सह. संस्था कायदा ९७ नियम () नुसार व्दारा खोलेश्वर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सो. लि., दिंद्रुड, करीता शक्ती प्रदानीत.**

# शेतकऱ्यांचे अरुंद शेतरस्ते होणार रुंद

## राज्य सरकारचा शासन निर्णय आला

मुंबई : शेतकऱ्यांच्या पारंपारिक अरूंद शेत रस्त्यांऐवजी किमान ३ ते ४ मीटर रुंद असलेले शेतरस्ते देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. अरूंद शेत रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना ट्रॅक्टर आणि कृषी अवजारे शेतात घेऊन जाताना अडथळा निर्माण होतो. त्यामुळे राज्य सरकारने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ नुसार कार्यवाहीसाठी शासन निर्णय गुरुवारी (ता.२२) प्रसिद्ध केला आहे. यामध्ये क्षेत्रीय अधिकारी/प्राधिकारी यांना राज्य सरकारने कार्यवाहीच्या सूचना दिल्या आहेत.


शेती कामासाठी यांत्रिकीकरणाचा वापर वाढू लागला आहे. शेतकरी ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, हार्वेस्टरचा वापर करत आहेत. तसेच शेतमाल वाहतुकीसाठी शेतात मोठे वाहने घेऊन जात आहेत. परंतु जुने रस्ते अरुंद आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मागणी आणि आवश्यकतेनुसार तपासणी करून सक्षम अधिकारी/प्राधिकाऱ्यांनी ३ ते ४ मीटर रुंद रस्ते उपलब्ध करून देण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. शेत रस्ते उपलब्ध करून देताना अधिकाऱ्यांनी तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यानी मागणी केलेल्या शेतरस्त्याचे जागेची प्रत्यक्ष पाहणी करून शेतरस्त्याची गरज तपासली जाणार आहे. तसेच अस्तित्वात असलेला नैसर्गिक मार्ग, पाऊलवाटा, इतर वहिवाटीच्या हक्कांचा आणि अडचणींचा व आक्षेपांचा विचार करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. परंतु अडचणी असतील तर मात्र पर्यायी आणि सोयीस्कर मार्गांचा विचार करण्यात येणार आहे. तर अपवादात्मक स्थितीत ३ ते ४ मीटरपेक्षा कमी परंतु जेवढा जास्त रुंद शेतरस्ता उपलब्ध करून देणे शक्य असेल तेवढा करू द्यावा, अशी निर्देश शासन निर्णयात देण्यात आले आहेत. बंधावरून रस्ता दिल्यानंतर बाजूच्या सीमांची निश्चिती करण्यात येणार आहे. जेणेकरून भविष्यात सीमांवरून वाद निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



तर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६६ च्या कलम १४३ नुसार आणि मामलेदार कोर्ट अॅक्ट, १९०६ च्या कलम नुसार शेत रस्त्याची कायदेशीर नोंद ७/१२ च्या हक्क या सदरात केली जाणार आहे. यामध्ये शेत रस्ता कोणत्या शेताच्या गटातून वा सर्वे नंबर मधून जातो, ते स्पष्ट करावं लागणार आहे. तसेच शेतरस्त्याची रुंदी, लांबी, दिशा आणि सीमाही सातबारा उताऱ्यावर घेण्यात येणार आहेत. त्यासाठी राज्य सरकारने सक्षम अधिकारी/प्राधिकारी यांना निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १४३ नुसार सीमांवरुन शेतरस्ता देण्याची तरतूद आहे. परंतु हा कायदा आला त्यावेळी शेती पारंपारिक पद्धतीने केली जात होती. त्यामध्ये बैलगाडी आणि बैलजोडीचा वापर केला जात होता. आता मात्र दिवसेंदिवस यांत्रिकीकरण वाढत आहे. त्यामुळे शेत रस्ते अरुंद झाले आहेत. त्यामुळे रूंद शेतरस्त्यांची गरज आहे. सीमावरील शेत रस्त्यावरून शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण होता. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने रस्ते रूंद करण्याचे निर्देश शासन निर्णयात दिले आहेत. अर्ज प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत संबंधित अर्ज निर्णयांकित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सध्याची चालू आणि प्रलंबित सर्व प्रकरणे शासन निर्णयापासून ९० दिवसांमध्ये निकाली काढण्याचे निर्देशही राज्य सरकार सरकारने दिले आहे आहे.

---

## केंद्र सरकारकडून तूर खरेदीला २८ मे पर्यंत मुदतवाढ



मुंबई : राज्यातील तूर उत्पादक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता पीपीएस अंतर्गत नाफेड आणि एनसीसीएफ यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या तूर खरेदीस आता केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने २८ मे २०२५ पर्यंत मुदत वाढवून दिली आहे. यामुळे राज्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

राज्यात तूर खरेदीची मुदत १३ मे २०२५ पर्यंत देण्यात आली होती. तूर उत्पादक शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेता तूर खरेदीची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आणि पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्र सरकारकडे केली होती. तसा प्रस्ताव पणन विभागाकडून केंद्रीय कृषी आणि कल्याण मंत्रालयाला पाठविण्यात आला होता. या मागणीची दखल घेत ही मुदत २८ मे २०२५ पर्यंत वाढवून देण्यात आली आहे. राज्यात १ लाख ३७ हजार ४५८ शेतकऱ्यांची तूर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी झालेली असून त्या पैकी १३ मे २०२५ पर्यंत ६९,१८९ शेतकऱ्यांकडून १, ०२,९५१ मे.टन तूर खरेदी झालेली आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार खरेदी प्रक्रियेसाठी ९० दिवसांची मुदत १३ मे २०२५ रोजी संपली होती. उर्वरित नोंदणीकृत शेतकऱ्यांची तूर हमीभावाने खरेदी होण्यासाठी मुदतवाढ मिळावी, अशी मागणी होती.

७५५० रुपयांनी तुरीची खरेदी

केंद्र सरकारने राज्याला सन २०२४-२५ हंगामात पीपीएस अंतर्गत २ लाख ९७ हजार ४३० मेट्रिक टन तूर खरेदीला मंजुरी दिलेली आहे. त्याकरिता नाफेड व एनसीसीएफ या केंद्रीय नोडल संस्थांच्या माध्यमातून राज्यातील ८ राज्यस्तरीय नोडल संस्थांमार्फत ७६४ खरेदी केंद्र राज्यात कार्यान्वित आहेत.

राज्यात नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून ७,५५० रुपये हमीभावाने तुरीची खरेदी चालू आहे. सध्या बाजारात तुरीचे दर कमी असल्याने हमीभावाचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. यासाठी उर्वरित शेतकऱ्यांची तूर हमीभावाने खरेदी होण्यासाठी तूर खरेदीला मुदतवाढ मिळावी, अशी मागणी केंद्र सरकारकडे करण्यात आली होती.

## असे करा शेळ्या, मेंढ्यांचे लसीकरण

शेळी, मेंढीपालनामध्ये संगोपनाइतकेच आरोग्य व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. आरोग्य व्यवस्थापनात दुर्लक्ष केल्यास कळपातील जनावरांना विविध आजारांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे तातडीने पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून कळपातील आजारी शेळ्यांवर उपचार केल्यास फायदेशीर होते.

आजारी शेळ्यांची लक्षणे : भूक, हालचाल मंदावते, रवंथ करणे थांबते, कळपापासून वेगळे राहण्याचा प्रयत्न करतात, धाप टाकते. लेंड्याचे प्रमाण कमी होऊन त्या घट्ट किवा जुलाब होतात, मूत्राच्या रंगात बदल दिसून येतो. नाकपुड्या कोरड्या पडतात, एखाद्यावेळेस शेळी लंगडते. अंगावरील केस ताठ होऊन कातड्याची चमक नाहीशी होते. शरीर तापमानात वाढ दिसून येते, पाणी कमी पितात आणि दूध कमी होते. अशक्तपणा, तोल जाणे, या प्रकारची लक्षणेही दिसून येतात.




प्रतिबंधात्मक लसीकरण : शेळ्यांमध्ये जिवाणूजन्य, विषाणूजन्य आजारांचा प्रादुर्भाव झाल्यास मरतूक होते. यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणजे वेळेवर लसीकरण करून घेणे अतिशय फायद्याचे ठरते. प्रति जनावर लसीकरणासाठी (शासकीय पशुवैद्यकीयमार्फत) येणारा वार्षिक खर्च ५० रुपयांपेक्षा पेक्षा जास्त नाही. स्वखर्चातून एक शेळीला दर तीन महिन्यात एकदा असे वर्षातून चार वेळा जंत निर्मूलन, आवश्यकतेनुसार गोचीड निर्मूलन आणि ५ प्रकारच्या आजारांच्या लसीकरणासाठी एका शेळीला १२५ ते १५० रुपये खर्च येतो. वेळापत्रकानुसार लसीकरण करणे फायदेशीर ठरते.

लसीकरण केल्यानंतर काही वेळा जनावरांच्या अंगावर गाठी येणे किंवा ताप येणे अशा तात्पुरत्या स्वरूपाच्या तक्रारी उद्भवू शकतात. त्यासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावेत. गाठ येते किंवा ताप येतो म्हणून लसीकरण टाळू नये. अशा गाठींमुळे जनावरांच्या जिवाला काही धोका होत नाही. त्यामुळे न घाबरता लसीकरण करून घ्यावे.लसीकरण कोणत्या वयाच्या जनावरास करावे ? पशूंमध्ये लसीकरण करावयाचे वेळापत्रक हे निश्चित केले असून ठरावीक वयात आणि अनुकूल परिस्थितीत करून घ्यायचे आहे. प्रत्येक संक्रमित आजारांसाठी लस टोचण्याचे प्रमाण व काळ निश्चित केला आहे. त्या काळातच लसीकरण करून घेतल्यास हंगामी जनावरे आजारास बळी पडत नाहीत.

लसीकरणाचे वेळापत्रक : आंत्रविषार ३ महिने वय असताना म्हणजेच थानतुटीनंतर पहिल्या मात्रेनंतर १० ते १२ दिवसांनी दुसरी मात्रा (बूस्टरडोस) देण्यात यावी. प्रतिवर्ष मे-जूनमध्ये पावसाळ्यापूर्वी. घटसर्प - ३ महिने वय असताना म्हणजेच थानतुटीनंतर ६ महिने पावसाळ्यापूर्वी. पी.पी.आर - ३ महिने वय असताना, म्हणजेच थानतुटीनंतर आवश्यकता नाही दर ३ वर्षाला, पण ज्या भागात जास्त प्रादुर्भाव आहे अशा ठिकाणी दर वर्षी केले तर फायदेशीर ठरते एप्रिल - मे. लाळ्या खुरकूत - ३ महिने वय असताना, म्हणजेच थानतुटीनंतर ६ महिने जून, डिसेंबर. देवी - ३ ते ५ महिने वय असताना, म्हणजेच थानतुटीनंतर प्रति वर्ष ऑक्टोबर (प्रादुर्भाव असल्यास). धर्नुवात - ३ ते ५ महिने वय असताना, प्रति वर्ष.

## अंजीराची शेती करण्याची पद्धत

भारतात अंजीर पिकवणे शेतकऱ्यांसाठी खरोखरच महत्त्वाचे आहे कारण ते विकून भरपूर पैसे कमवू शकतात. अंजीर देखील आपल्यासाठी खरोखर चांगले आहे आणि आपल्याला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. अंजीरमध्ये जीवनसत्त्वे आणि फायबरसारख्या अनेक चांगल्या गोष्टी असतात. आपण ते ताजे किंवा वाळलेले खाऊ शकता.अंजिराच्या जाती :

अंजीराच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. काही चांगल्या जाती खालीलप्रमाणे आहेत, पंजाब अंजीर, पुणे अंजीर, मार्शलीस अंजीर, पुणेरी अंजीर.

हवामान आणि जमीन : अंजीर वाढवण्यासाठी, तुम्हाला उबदार, कोरडे हवामान आणि चांगली माती असलेली जागा आवश्यक आहे जी खूप ओली नाही. मातीमध्ये विशिष्ट प्रमाणात आंबटपणा असणे आवश्यक आहे आणि त्यातून पाणी सहजपणे वाहून गेले पाहिजे. अंजीरांना चांगली वाढ होण्यासाठी आणि भरपूर फळे येण्यासाठी २५ ते ३५ अंश तापमानाची आवश्यकता असते.

फील्ड तयारी : अंजीर पिकवण्यासाठी मोकळी माती लागते. सर्व प्रथम, रोपाचे जुने भाग विशेष मशीनने काढून शेत स्वच्छ करा. नंतर, माती फोडण्यासाठी आणि मोकळी करण्यासाठी दुसरे



मशीन वापरा. यानंतर, शेत गुळगुळीत करून सपाट करा. यानंतर, जमिनीत सुमारे ५ मीटर अंतरावर खड्डा खणणे. शेवटी या खड्ड्यांमध्ये अंजिराची झाडे लावा आणि त्यांना थोडे पाणी द्या.

पेरणी आणि बियाणे प्रमाण : अंजिराची झाडे हलवण्याची उत्तम वेळ म्हणजे जुलै आणि ऑगस्टमध्ये पावसाळा. हे करण्यासाठी, आपण एकतर रोपे वाढवण्यासाठी स्वतःची जागा बनवू शकता किंवा त्यांची विक्री करणार्या स्टोअरमधून काही खरेदी करू शकता. प्रत्येक मोठ्या क्षेत्रासाठी आपल्याला सुमारे २५० रोपांची आवश्यकता असेल. झाडे एकमेकांपासून ५ मीटर अंतरावर ठेवण्याची खात्री करा.

वनस्पती सिंचन : जेव्हा आपण अंजीर पिकवतो तेव्हा आपल्याला हंगामानुसार वेगवेगळ्या वेळी पाणी द्यावे लागते. जर आपण त्यांना पावसाळ्यात लावले, जे सहसा जुलै आणि ऑगस्टमध्ये असते, तर आपल्याला त्यांना पावसापासून जितके पाणी मिळते तितके पाणी द्यावे लागत नाही. हिवाळ्यात दर १४ ते २० दिवसांनी पाणी द्यावे लागते. उन्हाळ्यात, अंजीरच्या झाडांना भरपूर पाणी लागते, म्हणून आपल्याला आठवड्यातून दोनदा पाणी द्यावे लागते. पावसाळ्यात आपल्याला त्यांना पाणी द्यावे लागत नाही, परंतु जर पुरेसा पाऊस पडला नाही तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे लागते.

वनस्पती काळजी : जर तुम्हाला तुमच्या अंजिराच्या झाडांना जास्त फळे द्यायची असतील तर तुम्हाला त्यांची चांगली काळजी घ्यावी लागेल. एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जमिनीत रोपे लावल्यानंतर वर्षभरात रोपांची छाटणी करणे. जेव्हा तुम्ही झाडे कापता तेव्हा त्यावर एक मीटर उंचीपर्यंत नवीन फांद्या वाढणार नाहीत याची खात्री करा. तसेच, कोणत्याही लांब फांद्या कापून टाका. हे रोपाला नवीन शाखा वाढण्यास आणि निरोगी होण्यास मदत करेल, ज्यामुळे त्याला अधिक फळे येण्यास मदत होईल. प्रत्येक उन्हाळ्यात तुमची अंजीर फळे येईपर्यंत छाटून टाकावीत.




### जागतिक दिवस
### राष्ट्रकुल दिन
### जागतिक स्किझोफ्रेनिया जागरूकता दिन

### महत्वाच्या घटना

१६२६ : पीटर मिन्युईटने स्थानिक लोकांकडून मॅनहटन बेट २४ डॉलरला विकत घेतले.
१६५३ : साली जर्मन देशाच्या संसदेने फर्डिनेंड द्वितीय यांना ऑस्ट्रिया देशाचे राजा म्हणून घोषित केलं.
१८३० : अमेरिकेमध्ये पहिल्यांदा प्रवासी रोडरेल सेवा सुरु करण्यात आली.
१८४४ : तारायंत्राचे संशोधक सॅम्युअल मोर्स यांनी स्वत: विकसित केलेल्या सांकेतिक भाषेत पहिला संदेश वॉशिंग्टन येथून बाल्टिमोर येथे पाठवला.
१८७५ : ब्रिटीश कालीन भारतात सर सैय्यद अहमद खान यांनी अलीगढ येथे मुहम्मद एंग्लो ओरिएन्टल शाळेची स्थापणा केली. वर्तमानात त्या शाळेलाच अलिगढ मुस्लीम विश्व विद्यालय म्हणून ओळखले जाते.
१८८३ : न्यूयॉर्क मधील ब्रूकलिन ब्रिज वाहतुकीस खुला झाला.
१९३१ : अमेरिकेतील वाल्टमोर ओहियो या रेल्वे मार्गावर पहिली वातानुकुलीत प्रवासी रेल्वे सुरु करण्यात आली.
१९४० : इगोर सिकोरसकी यांनी एका-रोटर हेलिकॉप्टर चे यशस्वी उड्डाण केले.
१९७६ : ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणार्या कॉंकॉर्ड विमानाची लंडन ते न्यूयॉर्क अशी सेवा सुरू झाली.
१९८६ : इजराईल देशाचा दौरा करणाऱ्या मार्गरेट थैचर या ब्रिटन देशाच्या पहिल्या पंतप्रधान ठरल्या.
१९९१ : एरिट्रियाला (इथिओपियाकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९९४ : २६ फेब्रुवारी १९९३ रोजी न्यूयॉर्क येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणणार्या चार मुस्लीम दहशतवाद्यांना प्रत्येकी २४० वर्षे कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.
२००० : भारतीय अवकाश संशोधन संस्थेने विकसित केलेला 'इन्सॅट-३बी' हा उपग्रह पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते राष्ट्राला अर्पण
२००१ : १८ व्या वर्षी माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करणारा शेर्पा तेब्बा त्रेथी सर्वात लहान व्यक्ती ठरला.
२००४ : उत्तर कोरीय देशाने आपल्या देशांत मोबाईल फोनवर प्रतिबंध लावला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८६ : डॅनियल फॅरनहाइट - जर्मन शास्त्रज्ञ (मृत्यू: १७३६)
१८१९ : व्हिक्टोरिया - इंग्लंडची राणी (मृत्यू: २२ जानेवारी १९०१)
१८४९ : सुप्रसिध्द डॉ. शास्त्रज्ञ ले. खर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तीकर यांचा जन्म.
१८९६ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील पंजाब राज्यातील थोर स्वातंत्र्य सेनानी व शहीद कम्युनिस्ट क्रांतिकारक आणि गदार पार्टीचे सदस्य कर्तारसिंग यांचा जन्मदिन.
१९२४ : रघुवीर भोपळे ऊर्फ 'जादूगार रघुवीर' - आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जादूगार. त्यांनी 'फिरता जादूगार' व 'मी पाहिलेला रशिया' ही पुस्तके लिहिली आहेत. (मृत्यू: २० ऑगस्ट १९८४)
१९३३ : हेमचंद्र तुकाराम तथा बाळ दाणी - रणजी व कसोटी क्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक (मृत्यू: १९ डिसेंबर १९९९)
१९४२ : माधव गाडगीळ - पर्यावरणतज्ञ
१९५२ : माजी भारतीय परराष्ट्र सचिव आणि ब्रिटनमधील भारतीय उच्चायुक्त रंजन मथाई यांचा जन्मदिन.
१९५४ : पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय गीर्यरोहक बचेंद्री पाल यांचा जन्मदिन.
१९७३ : भारतीय दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक शिरीष कुंदर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५४३ : निकोलस कोपर्निकस - सूर्यकेन्द्री विश्वाच्या संकल्पनेचा सिद्धांत मांडणारा पोलिश खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ (जन्म: १९ फेब्रुवारी १४७३)
१८७९ : प्रख्यात अमेरिकन निर्मूलन, पत्रकार, उपग्रहवादी आणि समाजसुधारक विल्यम लॉयड गॅरिसन यांचे निधन.
१९५० : भारताचे वे४३ गर्वनर जनरल आर्चिबाल्ड वावेल यांचे निधन. (जन्म: ५ मे १८८३)
१९८४ : डब्ल्यू.डब्ल्यू.ई. चे स्थापक विन्स मॅकमोहन सीनिय यांचे निधन. (जन्म: ६ जुलै १९१४)
१९९० : लोकसभेचे माजी अध्यक्ष के. स. हेगडे यांचा मृत्यू.
१९९३ : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी - जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (जन्म: ६ मे १९२० हैदराबाद)
१९९५ : हॅरॉल्ड विल्सन - इंग्लंडचे पंतप्रधान (जन्म: ११ मार्च १९१६)
१९९९ : विजयपाल लालाराम तथा 'गुरू हनुमान' - पद्मश्री आणि द्रोणाचार्य पुरस्कार विजेते कुस्ती प्रक्षिशक (जन्म: १५ मार्च १९०१)
२००० : मजरुह सुलतानपुरी - दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९९३) शायर, गीतकार आणि कवी (जन्म: १ आक्टोबर १९१९)
२०१४ : प्रसिद्ध भारतीय लेखिका व भारतीय राज्य राजस्थानमधील भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या सदस्या लक्ष्मी कुमारी चुंडावत यांचे निधन.

# बीड नगर परिषदचा अभिनव उपक्रम: आरसीसीच्या मुतारी नतर पत्र्याच्या शेडचे दोन उकिरडे

## जिल्हाधिकारी यांनी सखोल चौकशी करावी - एस.एम.युसूफ





बीड । प्रतिनिधी

शहरातील नवीन भाजी मंडई येथे काही दिवसांपूर्वी रात्रीतून पत्र्याचे दोन शेड बनविण्यात आले आहे. यापूर्वी सुद्धा बीड नगर परिषदने विकासाच्या नावाखाली राजुरी वेस समोर आरसीसी चे गाळे निर्माण केले होते. तिथे गेल्या अनेक वर्षांपासून मुतारी झाली आहे. तर या नुकत्याच बांधण्यात आलेल्या भाजी मंडईत दोन पत्र्याचे शेड उकिरडे झाले आहे. यामुळे लोक आता बीड नगर परिषदचे अभिनव उपक्रम आरसीसीच्या मुतारीनंतर पत्र्याच्या शेडचे दोन उकिरडे असे उपहासाने म्हणू लागले आहेत. जिल्हाधिकारी यांनी याप्रकरणी सखोल चौकशी करावी अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शासन-प्रशासन कधी काय करतील याचा नेम नसतो. अशाच प्रकारे बीड नगर परिषद सुद्धा कधी काय करेल किंवा करायला लावेल याचाही नेम नसतो. काही वर्षांपूर्वी बीड नगर परिषदेकडून मोठा गाजावाजा करत तत्कालीन नगराध्यक्षांनी ऐतिहासिक राजुरी वेस समोर असलेल्या रस्त्यालगतच्या पार्किंगच्या जागी अगडबंब नाल्याला खेटून व्यावसायिक तत्त्वावर देण्यासाठी आरसीसी चे गाळे बनविले होते. या अनधिकृत व्यावसायिक गाळ्यांमुळे शहरातील हक्काचा असलेला एक पार्किंग स्थळ गिळंकृत करण्यात आल्याने यावर एका नागरिकाने आक्षेप घेत थेट न्यायालयात याचिका दाखल केली होती. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना आता बीड नगर परिषदने काही दिवसांपूर्वी नवीन भाजी मंडई येथे भाजी विक्रेत्यांना बसण्यासाठी म्हणून एका रात्रीतून पत्र्याचे दोन शेड बांधले. हे शेड बांधण्याकरिता एवढी घाई, एवढी युद्ध पातळी का दाखविण्यात आली असे प्रश्न या दोन शेडच्या निर्माणानंतर उपस्थित होऊ लागले आहे. हे दोन शेड बनविण्या अगोदर या जागेवर भाजी विक्रेते कचरा आणि उरलेला भाजीपाला टाकून जायचे. तो बीड नगर परिषदकडून जेसीबी ने काढून घेतला जायचा. आता या पत्र्यांच्या शेडमुळे येथे टाकलेला कचरा व भाजीपाला जेसीबीने उचलता येणार नाही. कुणाला लहरीने या मोकळ्या जागी जमिनीपासून एक दीड फूट उंच वट्टे तयार करून त्यावर पत्र्याचे भले मोठे दोन शेड चक्क रात्रीतून बांधण्यात आले. येथे शेड जरी बांधण्यात आले असले तरी त्या वट्ट्यांवर एकही भाजीपाला विक्रेता बसत नाहीये. त्यांची तशी इच्छाही नाहीये ही वस्तुस्थिती आहे.

या अगोदरही याच भाजी मंडई मध्ये जमिनीपासून पाच-सहा फूट उंचीचे अनेक वट्टे आणि त्यावर शेड बांधलेले आहे. तिथेही भाजीपाला विक्रेते बसत नाही. सर्व भाजीपाला विक्रेते मंडईच्या आत असलेल्या सर्व रस्त्यांच्या दुतर्फा बसून भाजीपाला विकतात. ग्राहक ही तिथूनच खरेदी करतात. हा सर्व भूतकाळ वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ बीड शहरातील राजकारणी असो, अधिकारी असो, अभियंते असो, कर्मचारी असो की, बीड नगर परिषद असो यांना माहीत नाही असे नाही. तरीपण एका रात्रीतून हे शेड बांधण्यामागे काय गौडबंगाल आहे हा प्रश्न आहेच. काहीही गरज नसताना आणि कुणाची मागणीही नसताना भाजी मंडईतील हे दोन शेड का बनविण्यात आले? यात राजकारणी, बीड नगर परिषद, मुख्याधिकारी, अभियंता, कर्मचारी यापैकी कोणी-कोणी आर्थिक डल्ला मारला हा चौकशीचा विषय आहे. अशा प्रकारे जनतेकडून जमा झालेल्या महसुलाची उधळपट्टी केली जात आहे. याची सखोल चौकशी जिल्हाधिकारी यांनी करावी अशी मागणी मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

# ६० वर्षानंतर बंगालीपिंपळा-खळेगाव रस्ता कामास सुरुवात

## मच्छिंद्र गावडे यांच्या प्रयत्नाला यश



बीड। प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळा ते खळेगाव गायकवाड जळगाव ते उमापूर हा १३ किमीचा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचे असून सार्वजनिक विभाग बीड अखत्यारित येतो. हा रस्ता गेल्या ६० वर्षापूर्वी म्हणजे १९७२ रोजी झालेला होता. या रस्त्यासाठी खळेगाव येथील ज्येष्ठ नागरिक मच्छिंद्र गावडे व भाऊसाहेब वळकुंडे यांच्या अथक परिश्रमानंतर रस्ता कामाला मंजूरी मिळाली असून सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ता कामाला सुरू केली आहे

गेवराई तालुक्यातील जवळपास सर्वच गावातील रस्त्यांची अत्यंत दयनिय अवस्था पहावयास मिळते. अनेक रस्त्यावर बिले टाकून कामे न करताच बिले उचलण्याचा सपाटा गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत आहे. तशाच प्रकारे गेवराई तालुक्यातील खळेगाव ते बंगालीपिंपळा, गायकवाड जळगाव ते उमापूर हा एकूण १३ कि.मी. अंतराचा रस्ता गेल्या ६० वर्षांपासून झालेलाच नसून हा रस्ता चार सर्कलांना जोडणार मानला जातो. खळेगाव येथील ज्येष्ठ नागरिक मच्छिंद्र गावडे यांनी यांसह अनेक रस्ता कामासाठी मोठा संघर्ष उभा केलेला असून त्यांच्या अथक परिश्रमानंतर या रस्ता कामाला मंजुरी मिळाली असून रस्ता कामास सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरूवात केली आहे. या रस्ता कामामुळे जवळपास चार सर्कल मधील नागरिकांचा प्रवास सुखाचा होणार आहे. यामुळे मच्छिंद्र गावडे व त्यांच्या सर्व सहकार्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## थोडक्यात



### बाजारपेठेतील पुलावरील मासळी विक्री हटवा

पाटोदा। प्रतिनिधी


पाटोदा शहरातील मुख्य बाजारपेठेतील पुलावर सुरू असलेल्या बोंबील, झिंगे आणि इतर मासळी विक्रीमुळे परिसरात दुर्गंधी, घाण आणि अस्वच्छता पसरली असून याचा थेट त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांकडून जोरदार मागणी करण्यात येत आहे की, ''मासळी विक्रेत्यांना तात्काळ दुसऱ्या ठिकाणी हलवण्यात यावे आणि बाजारपेठ स्वच्छ व सुगंधी ठेवावी.''स्थानिक रहिवासी, व्यापारी संघटना, महिलांचा एकवटलेला आवाज आणि विद्यार्थी वर्ग यांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, ''बाजार दिवशी या भागातून चालणे कठीण झाले आहे. दुर्गंधीमुळे लहान मुलं, वृद्ध आणि रुग्ण यांना त्रास होत आहे. नगरपंचायतीने तत्काळ निर्णय घ्यावा, अन्यथा जनतेचा संयम सुटेल.''यामुळे पाटोदा नगरपंचायत प्रशासनाने यावर तातडीने कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.

### तलाठ्यांच्या बदल्या तालुक्याच्या बाहेर करा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसलेल्या तलाठ्यांमुळे प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे, त्यातील अनेकजण स्थानिक असल्याने ते कोणत्याही विषयात दबाव आणतात, त्यामुळे अशा तलाठ्यांना (ग्राम महसूल अधिकारी) तालुक्याबाहेर बदला अशी मागणी होत आहे याबाबत अधिक माहिती अशी की अशी पाटोदा तालुक्यात महसूल विभागात अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी ठाण मांडून बसले आहेत.वर्षपेक्षा अधिक काळ तालुक्यात ठाण मांडलेल्याकर्मचाऱ्यांचा आणि त्यामुळे प्रशासनावर होणाऱ्या परिणामांचा विषय पुन्हा चर्चेत आला आहे.यातील काही तर नोकरी लागल्या पासून तालुक्यात आहेत. हे कर्मचारी वारंवार सज्जा बदलून घेण्यासाठी दबाव आणतात, केलेल्या सूचनांचे पालन करीत नाहीत, नोटीसला जुमानत नाहीत आणि नव्याने येणारे कर्मचारी देखील त्यांचेच अनुकरण करतात त्यामुळे , प्रशासकीय काम करताना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहे तरी. या कर्मचाऱ्यांची तालुक्याबाहेर बदली करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.अनेक सजावर तलाठी आडवणुक करतात करता यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत तरी या अशा तलाठ्याची ही चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.

# गुरुमाऊली कॉलेज ऑफ नर्सिंग येथे जागतिक परिचारिका दिन




माजलगाव। प्रतिनिधी

संपूर्ण जगामध्ये स्वास्थ्य व्यवस्थेतील परिचारिकांचे उल्लेखनीय महत्त्व व अतुल्य योगदान याची दखल घेण्यासाठी इसवी सन १८५४ पासून जागतिक परिचारिका दिन हा साजरा करण्यात येतो. यावर्षी गुरुमाऊली कॉलेज ऑफ नर्सिंग माजलगाव येथे जागतिक परिचारिका दिन, शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या विशेष दिनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले गेले यामध्ये विद्यार्थ्यांना मान्यवरांचे अनमोल मार्गदर्शन लाभले तसेच त्यानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या बीएससी नर्सिंग च्या प्रथम वर्षाच्या प्रथम सत्र परीक्षेचा निकाल नुकताच लागला या मधे महाविद्यालयाच्या ७५ टक्के निकाल लागला व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. अभ्यासक्रमाच्या पहिल्याच वर्षी कठीण परिस्थितीशी सामना करत ध्येय आणि चिकाटीच्या जोरावर विशेष प्राविण्य घेत अनुक्रमे प्रथम क्रमांक निकिता राठोड द्वितीय क्रमांक आकांक्षा भालेराव तृतीय क्रमांक आरती नागरगोजे या विद्यार्थ्यांना विशेष सन्मान करण्यात आला या कार्यक्रमासाठी गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ.यशवंतराजे भोसले प्राचार्य निर्मला मॅडम फार्मसी प्राचार्य अमित बिंदू सर उपप्राचार्या पूनम खानापूरकर आदी मान्यवर उपस्थित होते

# वैष्णवी हगवणे प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करावा

## लाडकी बहीण जिवण संपवणार नाही एवढं कठोर शासन करा-दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील भुकूम ता.मुळशी येथील वैष्णवी शशांक हगवणे या विवाहित महिलेने सासरच्या लोकांकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली होती.लाडकी बहीण पुन्हा आत्महत्या करून आपल जिवण संपवणार नाही याच्यासाठी मुख्यमंत्री यांनी हस्तक्षेप करावा अश्या अशायाच निवेदन भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने तहसीलदारद्वारे मुख्यमंत्री यांना दिले.सदरील प्रकरणात वैष्णवीच्या सासरकडील हगवणे कुटुंबाने विवाहावेळी ५१ तोळे सोने, फॉर्च्यूनर कार आणि इतर महागड्या गोष्टी हुंडा म्हणून घेतल्या असूनही, तिच्यावर



लग्नानंतरही सातत्याने छळ होत राहिला.

विशेष म्हणजे या कुटुंबाचे काही सदस्य राजकीय पक्षाशी संबंधित असून त्यांच्या सामाजिक व राजकीय दबावामुळे चौकशीत अडथळे येण्याची शक्यता आहे. तसेच दोषींवर कठोर व वेगवान कायदेशीर कारवाई होणे गरजेचे आहे, फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करावे, प्रकरणाची सखोल, स्वतंत्र व पारदर्शक चौकशी व्हावी, पीडितेच्या कुटुंबीयांना शासनामार्फत न्याय व इतर मदत मिळावी,अशा मागण्या आम्ही काँग्रेस अनु जाती विभागाच्या वतीने करत आहोत.तसेच जर शासनाकडून या प्रकरणात तातडीने पावले उचलली गेली नाहीत, तर काँग्रेस अनु. जाती विभागाकडून आंदोलनात्मक मार्ग अवलंबण्यात येईल. या घटनेमुळे राज्यातील लाडक्या बहिणीमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, लाडकी बहीण आत्ता पुन्हा आपल जिवन संपवणार नाही एवढं कठोरातील कठोर शासन करावे अशी मागणी काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नारायण होके, काँग्रेस अनु जाती विभागाचे तालुकाध्यक्ष बळीराम कारके सह अप्पासाहेब भारस्कर, नागेश कांबळे, नासिर शेख, अशोक कांबळे, अंशीराम कांबळे, भानुदास कांबळे, धुराजी कांबळे, किसन लोखंडे,रवी कांबळे संतोष कांबळे शिवाजी कांबळे सह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रा. राजेंद्र सोनवणे यांना राज्यस्तरीय हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा.राजेंद्र सोनवणे यांना महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय हिंदी अध्यापक संघ द्वारा सन २०२५ चा राज्यस्तरीय हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.मिलिंद कांबळे हे होते.



महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय हिंदी अध्यापक संघ द्वारा आयोजित दोन दिवसीय कार्यशाळा त्रिमुर्ती पावन प्रतिष्ठाण नेवासा फाटा जि.अहिल्यानगर येथे दि.२१ आणि २२ मे रोजी पार पडली. या अधिवेशनात हिंदी या विषयात उत्कृष्ट अध्यापन कार्य करणार्या राज्यातील प्राध्यापकांना महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाच्या वतीने आदर्श हिंदी शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यात प्रा.राजेंद्र रामलिंग सोनवणे यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाने त्यांना संभाजीनगर विभागाचे जुक्टा अध्यक्ष प्रा.सत्येंद्र पाटील यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श हिंदी शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले. यावेळी आ.सत्यजीत तांबे, आ.विठ्ठलराव लंढे, साहेबराव घाडगे पाटील, रेवणनाथ कर्डीले, प्रा.पंजाब येडे, प्रा.श्रीकांत कुलकर्णी, प्रा.संतोष येवारे, राजकुमार कर्डीले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.सोनवणे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक राऊत एम.ए., कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए.एस. यांच्यासह सर्व कर्मचार्यांनी अभिनंदन केले.


# ना.सिरसट यांच्या नागरी सत्कारास उपस्थित राहावे-साळवे,शेख बाबा

माजलगाव। प्रतिनिधी

राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना.संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दि.२४ मे शनिवार रोजी बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.या नागरी सत्कारास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे माजी न.प. बांधकाम सभापती राजेश साळवे,शेख बाबा यांनी केले आहे.

शहरातील जुना मोंढा येथे आयोजित करण्यात आलेल्या या नागरी सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन नेते बाबुराव पोटभरे असणार आहेत.तर स्वागत





अध्यक्ष उपसभापती श्रीहरी मोरे,सचिन डोंगरे हे भूषवणार आहेत. त्याचप्रमाणे कार्यक्रमात माजी मंत्री आ.धनंजय मुंडे,आ.प्रकाश सोळंके आ.सुरेश धस,आ.विजयसिंह पंडित, आ. नमिता मुंदडा, शिवसेना युवा नेत्या हर्षदा सिरसट यांची उपस्थिती असणार आहे.दुपारी चार वाजता गायनाचा कार्यक्रम पेढे तुला व नागरी सत्कार असा भव्य दिव्य कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजन,आयोजन समितीद्वारे नवनाथ धायजे,भीमराव टाकणखार,प्रशांत ससाने,अशोक लांडगे,सदानंद प्रधान,मुरलीधर साळवे, सचिन जावळे,विठ्ठल पंडित, राहुल मस्के, प्रदीप पट्टेकर, वसंत वाव्हळकर, विजय धाईजे, विनोद शिंदे, अभिजीत पोटभरे, अक्षय मोरे, वाघमारे, नितिन काळे, किरण खळगे, विजय साळवे,धर्मा मोरे, आकाश माने, दीपक टाकणखार, जयदीप तांगडे, विठ्ठल पंडित, लखन हजारे इत्यादी बहुजन विकास मोर्चाची सर्व टीम काम करीत असून या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नगर परिषद माजी बांधकाम सभापती राजेश साळवे, शेख बाबा यांनी केले आहे.

# शिवसेना वडवणी तालुकाप्रमुखपदी माऊली गोंडे यांची वर्णी

वडवणी। प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते मा.ना. एकनाथजी शिंदे (उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना सचिव संजय मोरे, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी शिवसेनेच्या वडवणी तालुकाप्रमुखपदी नुकतीच माऊली गोंडे यांची निवड जाहीर करण्यात आली असून त्यांच्या या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील अनेक वेळा सरपंच भूषवलेले तथा कट्टर शिवसैनिक म्हणून माऊली गोंडे यांचा





वडवणी तालुक्यातील गावागावात, वाडी, वस्ती, तांड्या वरील जनमानसात दांडगा जनसंपर्क आहे. आजवर शिवसेना पक्षाने दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या पारदर्शक व गतिमान करण्यासाठी त्यांनी प्रमाणिक काम केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना सचिव संजय मोरे यांनी वडवणी तालुका शिवसेना तालुकाप्रमुख पदी नुकतीच माऊली गोंडे यांची निवड करण्यात आली आहे. त्याच बरोबर हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा सक्रियपणे प्रचार आणि प्रसार करत शिवसेना पक्ष वाढीसाठी कार्य कराल असा विश्वास शिवसेना पक्षाला वाटतो म्हणून आपली तालुकाप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली असल्याचे पत्र शिवसेना सचिव संजय मोरे यांनी दिले व त्यांचे अभिनंदन ही केले आहे. शिवसेना तालुकाप्रमुख या पदावर माऊली गोंडे यांची निवड झाल्याची माहिती मिळताच त्यांचे सर्वस्तरातन अभिनंदन केले जात आहे.

शिवसेनेशी एकनिष्ठ असणारा शिवसैनिक आजही प्रत्येक गावात आणि घराघरात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भगवा अंगा खांद्यावर घेऊन एकनिष्ठ असलेले शिवसैनीक माऊली गोंडे आजही पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या विचारांशी बांधील आहे. आगामी काळात जुन्या आणि नव्या शिवसैनिकांची मोट बांधून पक्षाला उभारी देण्याचे काम प्रामाणिकपणे करणार आहे. शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार आहे असा निर्धार नवनिर्वाचित वडवणी तालुकाप्रमुख माऊली गोंडे यांनी व्यक्त केला.

# न्याय हक्कासाठी, शेतकऱ्यांचा लोकलढा

## २५ मे पासून तांदळा येथे आमरण उपोषण,१४० गावातील शेतकरी होणार सहभागी

**कोळगाव । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील तांदळा येथे अजय पाटील साळुंखे दि.२५ मे रोजी पासून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आमरण उपोषण करणार असून सुमारे १४० गावातील शेतकरी या आंदोलनात सहभागी होणार आहेत,या आमरण उपोषणाची जनजागृती मोठ्या प्रमाणात होत असून जनजागृती बैठकींना सभेचे स्वरूप प्राप्त होत आहे.**

बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होती,या दुष्काळी भागातील कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जायकवाडीच्या कालव्यातून उपकालवा करुन दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाणी द्यावे,या मागणीसाठी १४० गावातील शेतकऱ्यांनी लोकलढा सुरू केला आहे. अजय पाटील साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली तांदळा येथे दि.२५ मे रोजी पासून आमरण उपोषण करण्यात येणार असून पुढील प्रमाणे उपोषणकर्त्यांची मागणी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड कडे निवेदनाद्वारे केली आहे.१)निवडणुकी वेळी दिलेले शेतकरी कर्ज माफीच्या आश्वासनाची आमलबजावनी करून सरसकट शेतकरयांचा ७/ १२ कोरा करण्यात यावा.

२)नदी जोड प्रकल्प करून धरणात,नदीत, नाल्यात,ओढयात,पाटात पाणी सोडा व ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी पाट काढण्यात यावे त्यामुळे कायम स्वरूपी मराठवाडयासह महाराष्ट्रील शेती सिंचणाचा प्रश्न मार्गी लागेल



३) स्वामीनाथन आयोगच्या शिफारशी प्रमाणे शेतीमालाला दिडपट हमीभाव दया व आज पर्यंत शेती मालाला योग्य हमी भाव न दिल्या मुळे शेतकरी वर्गाचे लाखों रूपये सरकारकडे बाकी आहे ते व्याजासह शेतकरी वर्गाच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे

४)एक रुपयात पिक विमा हि योजना बंद करण्यात येणार आहे ती बंद न करता चालुच ठेवा व पिक विमा चार कव्हरेज रद्द करण्यात येऊ नये

५) म.ग्रा.रो.ह.योजनेतील मंजुर रस्ते ,शेततळे ,विहिर ,गोठे, वृक्ष लागवड इत्यादी कुशल /अकुशल रककम तात्काळ वितरीत करावी.

६) हिंदु धर्मात पवित्र आसलेली गोमाताची कत्तल आज पर्यंत थांबलेली नाही त्यामुळे गोवंश कायदयात बदल करून कठोर अजामीन पात्र कायदा करण्यात यावा यामुळे दखल पात्र गुन्हा दाखल होईल व गो तस्कर यांना जरब बसेल

७) जायकवाडी धरणातुन राष्ट्रीय महामार्ग ()६१ च्या बाजुने पाण्याचा पाट काढण्यात यावा त्यामुळे असंख्ये गावातील पिण्याच्या व शेती सिंचणाचा प्रश्न मार्गी लागेल

८)अमृतेश्वर महादेव मंदिर परिसर मौजे तांदळा शिवारातील दरयात धरण बाधण्यात यावे या मुळे मोठया प्रमाणात परिसरातील गावांचा शेती सिंचण व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल तसेच राष्ट्रीय महामार्ग ६१ कल्याण विशाका पटणम महामार्गा मध्ये शेतकरी वर्गाचे शेती गेलेली आहे त्या सर्व शेतकरी वर्गाला आर्थिक मोबदला तात्काळ देण्यात यावा.

या उपोषणाची जनजागृती करण्यासाठी सरपंच नवनाथ गवते, सरपंच तुकाराम तळतकर, पत्रकार संतोष भारती, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष राहुल लोंढे,लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे, अजय मोटे,ओमकार शेंबडे अदी १४० गावात जाऊन आंदोलनांची जनजागृती करत आहेत,या जनजागृती बैठकांना सभेचे स्वरूप प्राप्त होत आहे.



**संघर्ष योद्धा मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्या निवासस्थानी आज तब्येतीची विचारपूस करण्यासाठी सदिच्छा भेट घेतली यावेळी अ.भा. छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक (अण्णा) रोमन, समाजसेवक गगांधर (नाना) काळकुटे, व मित्रपरिवार**

## शिवाजीनगर पोलीसांनी घरफोडीच्या गुन्ह्याची २४ तासात उकल करुन आरोपीस केले जेरबंद

बीड । प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड येथे दिनांक १९/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे विनोद रामनाथ बहिर वय ४७ वर्षे रा. श्रीराम नगर, बीड यांचे फिर्यादी वरुन गुरनं. २८३/२०२५ कलम ३३४(१),३०५ बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघकीस आणण्यासाठी शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. एम.बी.



खेडकर यांनी पोलीस ठाणे स्थरावर पोह/ १६६४ आघाव, पोह/४५४ सोनवणे, पोशि/९८३ सारणीकर, पोशि/५११ सानप, पोशि/२०७७ रहाडे यांचे पथक तयार करुन रवाना केले होते.

नमुद पथकाने तात्काळ घटनास्थळ जावुन घटनास्थळी व आजुबाजुचे परीसरात असलेले सी.सी.टि.व्ही. फुटेज तपासुन त्याआधारे तसेच तांत्रीक विश्लेषणाद्वारे सदरचा गुन्हा आरोपी नामे १) अभिषेक शेषेराव काशीद वय २५ वर्षे रा. चक्रधर नगर, बीड २) महेश अनिलराव साखरे वय ३२ वर्षे रा. जवाहर कॉलनी, बीड यांनी केल्याचे निष्पन्न केले. त्यानुसार सदर आरोपींचा शोध घेवुन त्यांना गुन्ह्यात अटक केली असुन सदर आरोपीकडुन गुन्ह्यातील गेला माल १) ०३ गॅस सिलेंडर कि. ९०००/- रु. २) एक पितळी पातेले किं. २०००/- रु. ३) रोख रक्कम १९००/- रु. व गुन्ह्यात वापरलेला एक महेंद्रा चार चाकी टेम्पो किं.अं. ४०००००/- रु. असा एकुण ४,१२,९००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असुन गुन्ह्याचा पुढील तपास पोह/१६६४ रविंद्र आघाव हे करीत आहेत. ◀◀ पान ३ वर

## अमृतच्या रांगोळी व निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### सावरकर जयंतीदिनी मान्यवरांच्या हस्ते होणार विजेत्यांचा गौरव

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), बीड व दीनदयाल शोध संस्थान जनशिक्षण संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय रांगोळी व निबंध स्पर्धेला युवक-युवतींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

ही स्पर्धा २२ मे २०२५ रोजी पांगरी रोडवरील जनशिक्षण



संस्थानच्या आवारात पार पडली. या स्पर्धेत फक्त अमृतच्या लक्षित गटातील १२ ते ३० वयोगटातील युवक-युवतींनी सहभाग नोंदवला. अमृतच्या उद्दिष्टानुसार, ज्या समाज घटकांना कोणत्याही महामंडळाचा लाभ मिळत नाही अशा खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा संधीचं दार ठरली.

रांगोळी स्पर्धेत १२ ते २१ वयोगटासाठी 'मेक इन इंडिया' आणि २१ ते ३० वयोगटासाठी 'माझी वसुंधरा' हे विषय होते. निबंध स्पर्धेत अनुक्रमे 'डॉ. आनंदी गोपाळ जोशी' आणि 'भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे' या विषयांवर विचार मांडण्याची संधी मिळाली. सहभागी स्पर्धकांनी उत्कृष्ट कला आणि लेखनकौशल्य दाखवले.

प्रत्येक ◀◀ पान ३ वर

## कर्मवीर ॲड.एकनाथराव आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त अंबाजोगईत आज राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार वितरण व व्याख्यान

अंबाजोगाई प्रतिनिधी

शोषित, पिडीत व उपेक्षितांच्या न्याय हक्कांसाठी शासन, प्रशासन व प्रस्थापितांच्या विरोधात बंड करून सर्वसामान्य व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्य झिजविणारे कर्मवीर ऍड.एकनाथराव (जिजा) आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त महाराष्ट्रात उपेक्षित माणसांच्या न्याय हक्कासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्याला प्रेरणा मिळावी. यासाठी युवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्या वतीने समाजात



प्रबोधन करणारे, धम्म चळवळ गतीमान करून योगदान देणारांना हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे हे ९ वे वर्ष आहे. कर्मवीर ऍड.एकनाथराव आवाड राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार-२०२५ चे वितरण व मान्यवरांचे व्याख्यान आज शनिवार, दि.२४ मे २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.विजय कुमठेकर (जालना) तर उद्घाटक म्हणून दिपक वजाळे (उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई.) हे असणार आहेत. यावेळी मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.मिलींद आवाड (जे.एन.यु.दिल्ली) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या प्रसंगी लक्ष्मीकांत शिंदे (पुर्णा) यांना राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार - २०२५ देवून सन्मानित करण्यात येणार आहे. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून दत्त सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रशांत दहिफळे, सचिन बगाडे (अध्यक्ष, सत्यशोधक बहुजन आघाडी.), संतोष नरसिंगे (सि.ओ.महानेता ग्रुप.), शितल लांडगे (अध्यक्ष, स्वप्नपूर्ती

◀◀ पान ३ वर

## अवकाळी पावसाने टरबुज-आंब्याची नासाडी, दरही घसरले

### धानोरा परिसरातील चित्र



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा खुर्द परिसरात गेल्या आठ दिवसापासून सतत अवकाळी पाऊस पडत असल्यामुळे आंब्यासह टरबुजाची नासाडी होत आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेले फळपीक हातून जात आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

धानोरा परिसरात गेल्या आठ दिवसापासून सतत अवकाळी पाऊस सुरू असल्यामुळे शेतात असलेल्या टरबूज आणि आंबे केळी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. पाऊस उघडत नसल्यामुळे शेतकऱ्यांना आंबे झाडावरून काढता येत नाही. वारे आणि पावसामुळे आंब्याची मोठी नासाडी झाली आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेली आंब्याची फळबाग पावसाने हिरावून घेतली आहे. धानोरा परिसरातील काही शेतकऱ्यांनी टरबुजाची शेती केली आहे. मे महिन्यात टरबूजाला चांगला भाव मिळेल हे अपेक्षाने शेतकऱ्याने मोठ्या कष्टाने केलेली टरबुजाची शेती अवकाळी पावसामुळे अडचणीत आली आहे. सतत पाऊस पडत असल्यामुळे टरबूज जागेवरच नासून जात आहे. पाऊस आधी टरबुजाचा भाव १४ ते १५ रुपये किलो दर होता. आता दरही घसरले आहेत. आता टरबुजाचे दर पाच ते सहा रुपये किलो सुरू आहेत. जीवाचे रान करून पिकवलेले टरबुजाचे ५० टक्के पीक शेतकऱ्यांच्या हातून गेले आहे. टरबुजासाठी

◀◀ पान ३ वर



**बीड : एसटी सीसीएस बँकेच्या एसटी कामगार संघटना व एसटी कामगार सेना यांचे अधिकृत उमेदवार श्री गणेश चव्हाण यांची संचालक पदावर निवडून आल्या बद्दल त्यांचे शिवसेना कार्यालयावर जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम व उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ महूवाले व विधानसभा प्रमुख सुशील भैय्या पिंगळे इतर पदाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी एसटी कामगार सेनेचे विभागीय सचिव राहुल बहीर ,हावळे पाटील ,सय्यद ख्वाजा,तसेच कामगार संघटनेचे वल्लभ चिरके,नितीन रसाळ,विजय कुडके व इतर एसटी कर्मचारी हजर होते.**

## मस्साजोग येथील एमआरईजीएसमधून करण्यात आलेली विहीरच गेली चोरीला

### कागदोपत्री लाभार्थी असलेल्या मिथुन देशमुख यांची प्रशासनाकडे धाव, वरिष्ठ अधिकारी, ग्रामसेवक व रोजगार सेवकाकडून लाभार्थ्यांना कल्पनाही न देता बोगस बिले उचलल्याची दिली तक्रार

**बीड । प्रतिनिधी**

**शासनाकडून शेतकर्यांना एमआरजीएसच्या माध्यमातून विहीरी देवून शेतकर्यांची प्रगती वाढविण्याचे काम केले जाते मात्र या कामात शासनाचेच कर्मचारी बोगसगिरी करत कोट्यावधीचा माया कमविण्याचे काम केले आहे. मस्साजोगच्या मिथून देशमुख यांच्या शेतामध्ये एमआरजीएसची विहीर दाखवत ग्रामसेवक व रोजगार सेवकाकडून चक्क विहीर न खोदकाम करताच बिले उचलण्याचे काम केल्याची तक्रारी शेतकरी मिथून देशमुख यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील गट नं २५/२ ब मधील ०.६१ आर एवढे क्षेत्र असलेल्या जमीनीमध्ये विहीर मंजूर करत विहीरीचे कसल्याही प्रकारचे काम न करताच पैसे उचलण्याचे काम येथील ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवकाकडून करण्यात आला आहे. मिथून देशमुख हे काही वर्षापासून आई वडील आजारी असल्याने बीड येथे राहण्यास आले




आहेत. वडील गंभीर आजारी असल्याने २०२३-२४ या वर्षामध्ये गावातील शेतामध्ये जाणे अल्प झाले. या काळातच येथील ग्रामसेवक दत्तात्रय गव्हाणे, ग्रामरोजगार सेवक अमोल बळीराम बनसोडे या दोघांनी हातमिळवणी करून मिथून देशमुख यांच्या शेतात विहीर मंजूर केली. यासाठी लागणार्या मिथून देशमुखचा जीओ टॅग फोटो त्याला त्याच्या शेतातील शेजारी असलेल्या नदी खोली करणाला लागत असल्याचे सांगून बांधावर फोटो घेण्यात आला. त्यानंतर या दोघांनी शेतकरी मिथून देशमुख यांना विहीरबाबत कसलीही कल्पना न होवू देता, संपूर्ण विहीर बोगस दाखवत बिले उचलण्याचे काम केले. याबाबत मिथून देशमुख यांनी विचारणा केली असता उडवाउडवीचे उत्तर देत काही पैसे घेवून गप्प राहण्याची धमकी दिली. यानंतर मिथून देशमुख यांनी पंचायत समितीच्या तत्कालीन बिडीओ मोराळै यांची भेट घेवून सर्व प्रकार सांगितला मात्र या बोगसगिरीत यांचाही हात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शेतकरी देशमुख यांच्याकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली असून यामध्ये त्यांनी माझी विहीरच चोरीला गेली असल्याचे म्हटले आहे. यामुळे जिल्हा खळबळ उडाली आहे.

### कर्मचाऱ्यांकडून शासनाच्या निधीचा सावळा गोंधळ

शासनाकडून पगार घेत शासनाची इमाने इतबारे काम करणे ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवकांचे काम असतांनाही मस्साजोग येथील ग्रामसेवक गव्हाणे व ग्रामरोजगार सेवक बनसोडे यांनी चक्क शासनाचा निधी हडप करण्याचे काम केले आहे. या बोगस कर्मचार्यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### मजूरांचे नावे बोगस

एमआरजीएस अंतर्गत करण्यात आलेल्या अनेक विहीरींच्या कामामध्ये बोगस मजूरांचे नावे दाखवत निधी हडप करण्याचे काम ग्रामसेवक व रोजगार सेवकाकडून करण्यात येत असल्याचे या घटनेतून उघडकीस आले आहे. मिथून देशमुख यांची नावाने करण्यात आलेल्या विहीरीचा संपूर्ण निधी हडपण्याचे काम रोजगार सेवक व ग्रामसेवक यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# छ. शिवाजी महाराजांचा पुतळा हटविला

## चाकण नगर परिषदेची पोलिस संरक्षणात कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील संग्राम दुर्गापासून जवळच असलेल्या चाकणमधील नेहरू चौकात धर्मवीर संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानच्या वतीने बसविण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वरूढ पुतळा चाकण नगर परिषदेने पोलिसांच्या संरक्षणात काढून घेतला. पुतळा बसविण्यासाठी कायदेशीर परवानगी घेतली नाल्याचे कारण देत ही कारवाई करण्यात आली. मात्र संतप्त झालेल्या शिव प्रेमींनी पोलिसांचा निषेध व्यक्त करत नगर परिषद ठिय्या मांडला.



### धर्मवीर संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठान कडून निषेध व्यक्त नगर परिषदेत ठिय्या

स्वराज्याची प्रेरणा निर्माण केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वरूढ पुतळा धर्मवीर संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान च्या मावळ्यांनी मनोहर वाडेकर यांच्या नेतृत्वात पुणे जिल्ह्यातल्या चाकणमधील नेहरू चौकात दिनांक २१ मे २०२५ रोजी उभारला होता. मात्र दिनांक २२ मे रोजी चाकण पोलिसांनी हा पुतळा काढून घेतला. याची माहिती मिळताच धर्मवीर संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानच्या मावळ्यांनी चाकण पोलिस ठाण्यात धाव घेतली. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोलिसांनी ताब्यात घेतलेला अश्वारूढ पुतळा परत करावा अशी मागणी त्यांनी पोलिस प्रशासनाला केली. मात्र हा पुतळा आम्ही नाही तर पोलिस प्रशासनाच्या सुरक्षेत नगर पालिकेने काढला असल्याची माहिती पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ यांनी दिली. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या त्या पुतळयासाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि शिवप्रेमी नगर परिषदेत पोहचले. मात्र सीइओ हजर नसल्याने धर्मवीर संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या पदाधिकारी शिव प्रेमींनी नगर परिषदेतच ठिय्या मांडला. आपण बाहेरगावी असून कार्यालयात आल्यावर रीतसर परवानगी देत पुतळा परत करू असे आश्वासन सीइओ अंकुश जाधव यांनी दिले. परंतु जोपर्यंत परवानगी दिली जात नाही आणि सन्मानाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा परत केला जात नाही तोपर्यंत ठिय्या आंदोलन सुरूच ठेवणार असल्याची माहिती मनोहर वाडेकर यांनी दिली.

यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील, मराठवाडा अध्यक्ष शंभूराज अप्पा गंभीरे यांच्यासह धर्मवीर संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# पुण्याची पावसाळ्याआधीच दाणादाण

## मनपा प्रशासनाचे नाले सफाई व्यवस्थापन ठरले कुचकामी

**पुणे । प्रतिनिधी**

तुडुंब भरलेल्या नाल्या, रस्ते जलमय, त्यावर तरंगणारा प्लास्टिक कचरा सध्या हे चित्र दिसत आहे मेट्रो सीटी पुण्यात. गत दोन - चार दिवसापासून पुण्यात कोसळत असलेल्या अवकाळी पावसने कहर केला अन् पावसाळया आधीच पुण्यात कचऱ्याचा महापूर आला. पुणे शहराची अवकाळी पावसाने दाणादाण उडाली. मनपाचे नाले सफाई व्यवस्थापन पुन्हा कुचकामी ठरल्याचे समोर आले.

पुणे शहरासह पिंपरी चिंचवड आणि जिल्ह्यांत अवकाळी पावसने चांगलेच झोडपले आहे. शहरांत अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला. अनेक ठिकाणी वाहनाच्या रंगा जागेवर थांबल्या. त्यामुळे प्रवाशांचे हाल होताना दिसत आहेत. मनपा प्रशासनाने नालेसफाई व्यवस्थित केली असती तर अशी वेळ आली नसती अशी चर्चा पुणेकरांमधून केली जात आहे. एकूणच अवकाळी पावसाने मनपा प्रशासनाचे कुचकामी नियोजन चव्हाट्यावर आले.



पश्चिम महाराष्ट्रासह उर्वरित विदर्भ आणि मराठवाड्यातही अवकाळी पावसाने चागलाच जोर धरलाय. अनेक जिल्ह्यांत अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. फळबागा उध्वस्त झाल्यात, उन्हाळी पिकांचे नुकसान झाले. वीज पडून अनेकांचा मृत्यू झाला तर पशुधन दगावल्याच्याही अनेक घटना घडल्यात. कात्रज बोगद्याजवळ दरड कोसळली मध्यरात्री झालेल्या जोरदार पावसामुळे पुण्यावरून खेड शिरपूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर कात्रजच्या नवीन बोगद्याच्या अलीकडील दरड कोसळल्याची घटना घडली. यात जीवित हानी झालेली नाही मात्र वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. त्यावरील दगड मातीचा ढिगारा हटवून आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रशासनाने वाहतूक सुरळित करून दिली.

# पिंपरी येथील दिवाणी न्यायालयातील मुख्य न्यायाधीश मा. गजभिये साहेब व न्यायाधीश मा.मोरे साहेब यांचा निरोप व सत्कार समारंभाचा कार्यक्रम न्यायालयातील वकील पुरुष कक्ष येथे मोठ्या उत्साहात पार पडला

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी येथील दिवाणी न्यायालयातील मुख्य न्यायाधीश मा. गजभिये साहेब यांची पदोन्नती झाल्याबद्दल तसेच न्यायाधीश मा.मोरे साहेब यांची बदली झाल्याबद्दल पिंपरी चिंचवड अँड असोशिएशनने त्यांचा जाहीर सत्कार व निरोप समारंभाचे आयोजन केले होते यावेळी पिंपरी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील न्यायाधीश मा. गवळी साहेब, मा. आमूदी साहेब, मा. गायकवाड साहेब, मा. श्रीमती चव्हाण मॅडम, मा. श्रीमती पाटील मॅडम हे उपस्थित होते.

यावेळी मुख्य न्यायाधीश मा. गजभिये साहेब व मा.मोरे साहेब यांनी निरोप समारंभाच्या कार्यक्रमात आपले मौलिक विचार व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड अँड.असोशिएशनचे अध्यक्ष पांडुरंग शिनगारे, उपाध्यक्ष अजय यादव,सचिव अँड. संदीप तापकीर,महिला सचिव ड.संगीता कुशलकर सहसचिव पद्मावती पाटील, खजिनदारड. विशाल पोळ,हिशोब तपासणीस ड.प्रेरणा चंदानी , सदस्य ड. सुषमा पाटील, ड. आरती कुलकर्णी,ड. पोर्णिमा मोहिते,ड.रूपाली पवार ड.अक्षय चौधरी ड.विजय भोंडे यांनी केले तर सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष पद वकील विकास संघाचे विद्यमान अध्यक्ष ड अरुण खरात मामा यांनी भूषविले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून पिं.चिं.डअसो. चे माजी अध्यक्ष ड.नारायण रसाळ हे उपस्थित होते.



सदर कार्यक्रमाच्यावेळीड बी.के.कांबळे,ड. देविदास शिंदे, ड. संतोष काशिद, ड. प्रमिला गाडे, ड सुनील कडूसकर , ड. नितीन कांबळे, ड. समीर चव्हाण,ड तेजस चवरे, ड. राजेश रणपिसे, ड. विजय रोडे, ड सयाजी साळुंखे, ड नागेश गर्जे, ड बाजीराव दळवी , ड. ऋषी मगर, ड. प्रकाश नेनाळे, ड .हर्ष गोधवानी,ड तुषार खरात ड विशाल गभाले,ड. नारायण थोरात,


ड. एम. एस. जाधव,ड. धीरज कुचेरिया,ड. चंद्रकांत माने,ड. नवनाथ कुटे,ॲड. सूर्यकांत कोंडेदेशमुख, ड. धीरज पवार,ड. प्रणव नवले,ड. ओमकार नानेकर,ड. संजय जाधव, ॲड. जयेश वाकचौरे,ड. प्रकाश नेवाळे,ड. विजय वाघोदे,ॲड.दत्तात्रेय भोंडे, ॲड. अमोल उचाळे,ड. स्नेहा कांबळे,ड. कांता गोरडे,ड. शीला दळवी,ड. धनश्री कांबळे,ॲड. प्राजक्ता कदम, ॲड. सुलभा खामकर , ॲड. पल्लवी कुऱ्हाडे, ॲड. प्रिया रसाळ तसेच बहुसंख्य वकील बंधू भगिनी उपस्थित होते उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पिंपरी चिंचवड अँड असोशिएशनचे सचिव अँड. संदीप तापकीर सदस्य ड. सुषमा पाटील यांनी केले.तर आभार प्रदर्शन महिला सचिव अँड. संगीता कुशलकर यांनी केले.

# पुण्यातील विवाहित महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; वडगाव मावळमध्ये चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा पतीनेच केला खून

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

राज्यामध्ये विवाहित महिलांना होणारा छळ हा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. पुण्यामध्ये वैष्णवी हगवणे हिचे प्रकरण ताजे असताना वडगाव मावळमध्ये देखील अशीच एक घटना घडली आहे. विवाहित महिलांना हुंडाबळी आणि चारित्र्याचे संशय घेत मारहाण केली जात आहे. वडगाव मावळमध्ये चारित्र्याच्या संशयावरूने पतीने पत्नीचा दगडाने ठेचून खून केला. या घटनेमुळे सर्वांनी रोष व्यक्त केला आहे. ही घटना शुक्रवारी (दि. २३) सकाळी ६:५५ वाजण्यापूर्वी कोंडिवडे आं मा ता.मावळ हद्दीत घडली. यामुळे महिलांची सुरक्षा आणि न्याय हे मुद्दे चर्चेत आले आहेत.

या वडगाव मावळ मधील घटनेमध्ये सोनाबाई अशोक वाघमारे वय ३३ वय रा. कोंडिवडे आं मा ता.मावळ खून झालेल्या पत्नीचे नाव आहे.तर अशोक बारकु वाघमारे वय ४० रा. परंदवडी ता.मावळ खून केलेल्या आरोपी पतीचे नाव आहे. पोलीस निरीक्षक कुमार कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी पती अशोक वाघमारे हा त्याच्या सासरी कोंडिवडे आं मा येथे पत्नी सोनाबाई वाघमारे हिच्या सोबत राहत होता.



त्याला तीन मुलं आहेत.

आरोपी पती अशोक वाघमारे त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत होता. संशयावरून शुक्रवारी सकाळी ६:५५ वा. वनक्षेत्राच्या ओढ्यावर दगडाने ठेचून खून केला. आरोपी स्वतः कामशेत पोलीस स्टेशनमध्ये हजर झाला. आरोपीला अटक करण्यात आली. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शितलकुमार डोईजड करत आहेत.

पिंपरी चिंचवडमध्ये वैष्णवी हगवणे हिची आत्महत्या पुण्यातील पिंपरी चिंचवडमध्ये वैष्णवी हगवणे नामक महिलेने देखील सासरच्या छळाला कंटाळून जीव दिवा आहे. वैष्णवीने लहान बाळ असताना देखील आत्महत्या केल्यामुळे सर्वांनी दु:ख व्यक्त केले आहे. वैष्णवी हगवणे हिने शशांक हगवणेसोबत प्रेम विवाह केला होता. यानंतर तिचा पैशांसाठी आणि हुंड्यासाठी छळ करण्यात आला. तसेच तिला सासू, सासरा आणि नंनदेकडून मारहाण करण्यात आली. आत्महत्येनंतर तिच्या शरिरावर मारल्याचे व्रण आहेत. तिचा सासरा राजेंद्र हगवणे हा राष्ट्रवादी अजित पवार यांच्या पक्षाचा पदाधिकारी होता. यामुळे या प्रकरणाला राजकीय वळण मिळाले.

वैष्णवी हगवणे हिच्या आत्महत्येनंतर राज्यभरातून न्यायाची मागणी केली जाऊ लागली. यानंतर तिचा सासरा आणि दीर सात दिवसांपासून फरार होता. पोलिसांनी सहा टीम्स तयार करुन त्याचा शोध घेतला. आज अखेर (दि. २३) दोघांना स्वारगेट येथून पोलिसांनी अटक केली. अखेर आज पहाटे बावधान पोलिसांनी दोघांनाही अटक केली. आरोपी तळेगाव येथील एका हॉटेलमध्ये काही मित्रांसोबत जेवत असल्याचे सीसीटीव्हीमध्ये आढळून आले. दरम्यान घटनेनंतर पोलिसांनी वैष्णवीचा नवरा शशांक, सासू लता हगवणे आणि नणंद करिश्मा हगवणे यांना आधीच अटक केली होती. पण सात दिवसांपासून हे दोघे तळेगाव परिसरातच लपून बसले होते. याची माहिती मिळताच पोलिसांनी शिताफीने दोघानांही ताब्यात घेतले.

# खडकवासला साखळी धरणं धोकादायक? निधी अभावी पावसाळ्यापूर्वीची कामे ठप्प

**पुणे । प्रतिनिधी**

पावसाळ्यापूर्वी होणाऱ्या खडकवासला साखळी धरणांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होत नसल्याने दुरुस्तीची कामे ठप्प पाडली असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. धरणांची देखभाल दुरुस्ती वेळेत न केल्यास पावसाळ्यात पुराच्या पाण्याचा धोका वाढू शकतो.

यंदा पावसाळ्यापूर्वीच वळवाच्या पावसाने जोर धरला असल्याने जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. खडकवासला साखळी धरणातील पाणी साठ्यातही वाढ होत आहे. यामध्ये १८७९ ला बांधण्यात आलेले खडकवासला धरण, १९५७ ला बांधलेले पानशेत धरण तर १९७७ चे वरसगाव येथील धरण यांचा समावेश होतो. पावसाळ्यात धरणात साठणाऱ्या अतिरिक्त पाण्याचे नियोजन करण्यासाठी, पूर परिस्थिती नियंत्रणासाठी धरणांची देखभाल पावसाळ्यापूर्वीच होणे गरजेचे असते. मात्र त्यासाठी निधीची आवश्यकता भासते. मात्र या कामासाठी निधीच उपलब्ध नसल्याने ही दुरुस्तीची कामे ठप्प झाली आहेत. धरणाच्या मुख्य तसेच इतर लोखंडी दरवाजाचे ग्रीस ऑइलिंग करणे, स्वयंचलित तंत्रज्ञानाची तपासणी करून बिघाड असल्यास दुरुस्ती करणे, आवश्क ठिकाणी रंगरंगोटी करणे आदी कामे महत्वाची असतात.

कसा उद्भवू शकतो धोका ?

धरण परिक्षेत्रात सरासरी अंदाजापेक्षा पाऊस अधिक झाला आणि धरणात क्षमतेपेक्षा अधिक पाणी साठा झाला तर पाण्याचा विसर्ग करण्याच्या यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्यास पूर परिस्थितीचा धोका निर्माण होतो. पावसाळ्यात अशी परिस्थिती केंव्हाही उद्भवू शकते.

कोट धरणांच्या

वार्षिक देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी अद्याप निधी उपलब्ध झाला नाही, त्यामुळे दुरुस्तीची कामे सुरू केली नाहीत. निधी उपलब्ध झाल्यानंतर तत्काळ काम हाती घेण्यात येईल.

# अवकाळी पावसामुळे शेतकरी धास्तावला

भोर : राज्यात सर्वत्र पडत असलेला पाऊस शेतकऱ्यांची चिंता वाढवत आहे. या मुसळधार पावसाने सध्याच्या पिकांचे नुकसान झालेच पण त्याशिवाय येणाऱ्या खरीप हंगामावरसुद्धा पावसाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. पाऊस सुरू असल्याने पिके काढल्यानंतर उन्हाळ्यात शेतीची होणारी मशागत थांबली आहे. याचा थेट परिणाम हंगामातील पिकांच्या वाढीवर होण्याची शक्यता निर्माण झाली असून, यामुळे बळीराजा धास्तावला आहे.

उन्हाळ्यामध्ये शेतीची नांगरणी करून काही दिवस उन्हामध्ये तापण्यासाठी जमिनीला विश्रांती देण्याची पारंपरिक पद्धत आहे. यावर्षी मे महिना सुरू झाल्यापासून राज्यात विविध ठिकाणी सलग पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांना नांगरणी करण्यास पावसाने उसंतच दिलेली नाही. जमिनीची नांगरणीसह शेणखत टाकणे, भाजणी करणे जामिनीला विश्रांती देणे यासाठी हवामान कोरडे असणे आवश्यक असते. मात्र, सततच्या पावसामुळे या प्रक्रिया खोळंबल्या आहेत.

सध्या तालुक्यातील उन्हाळी कांदा, भुईमुग पिकाची काढणी बहुतांश ठिकाणी पूर्ण झाली आहे. तर काही ठिकाणी काढणीला आलेला उन्हाळी कांदा भुईमूग, पीक शेतातच खराब झाले आहे. तसेच शेतात काढून ठेवलेला कांदा भिजल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. जनावरांसाठी साठवलेला चारा देखील भिजल्याने चाऱ्याचा तुटवडा निर्माण होणार आहे. तालुक्यात पावसाने आत्तापर्यंत जोरदार हजेरी लावली आहे. जर पुढील काही दिवस असेच वातावरण राहिले, तर उत्पादनावर मोठा परिणाम होईल, असे शेतकरी सांगतात.

# अत्याचाराची बळी ठरलेल्या अल्पवयीन मुलीचे टोकाचे पाऊल

## तीन दिवसापासून शोध सुरू : भीमा नदीत उडी घेतल्याचा अंदाज

**खेड । प्रतिनिधी**

कॅटरिंगचे काम करणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर सोबतच्या आचाऱ्याने अत्याचार केला. या बाबतची तक्रार मुलीच्या कुटुंबीयांनी पोलिसात केली. मात्र यात झालेल्या मानसिक त्रासाला सामोरी जात असणाऱ्या पीडित मुलीने भीमा नदीत उडी घेतली. गेल्या तीन दिवसापासून तिचा शोध घेतला जात आहे. ही घटना चांडोली गावातील.

राजगुरूनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन मुलगी कॅटरिंगच्या कामासाठी सहकारी आच्याऱ्यासोबत एका लग्न समारंभासाठी गेली होती. दरम्यान संधीचा गैरफायदा उचलत सोबत असणाऱ्या आच्याऱ्याने तिच्यावर जबरदस्ती अत्याचार केले. शिवाय याची माहिती कोणाला न देण्याची धमकीही दिली. मात्र पीडित मुलीने सर्व प्रकार घरी कुटुंबियांना सांगितला. संतप्त कुटुंबीयांनी या प्रकरणी आच्याऱ्याविरुद्ध राजगुरूनगर पोलिसात धाव घेत गुन्हा दाखल केला. मात्र पीडित मुलीला या सर्व घटनेचा मानसिक त्रास झाला. त्यानंतर ती तीन दिवसापासून बेपत्ता झाली. या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली असून तिची ओढणी आणि चप्पल भीमा नदी काठी आढळून आल्याने तिचा नदीपात्रात शोध घेतला जात आहे. मात्र अद्यापही तिचा शोध लागला नाही. नदीत पावसामुळे गढूळ पाणी वाढले आहे तसेच मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढली आहे, त्यामुळे शोध घेण्यास अडचणी येत आहेत. दरम्यान राजगुरू नगर पोलिसांनी आरोपी आच्याऱ्याला अटक केली आहे.

# ७ दिवसांपासून पोलिसांना चकवा! हगवणे पिता-पुत्राने या दिवसांमध्ये कसा केला प्रवास?

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणातील तिची सासू, नवरा आणि नणंद यांना पोलिसांनी अटक केली असून, गेल्या सात दिवसांपासून फरार असणारा तिचा सासरा आणि दीराला देखील पोलिसांनी अटक केली आहे. आज पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास बावधन पोलिसांनी अटकेची कारवाई करत पिता पुत्राला बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी सापळा रचून अटकेची कारवाई केली आहे. मात्र हे दोघे बाप आणि मुलगा गेल्या सात दिवसांपासून कोठे गेले याची माहिती आता समोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ मे रोजी वैष्णवी हगवणे हिने आत्महत्या केल्याची बातमी समोर आली. तिच्या वडिलांनी हगवणे कुटुंबावर गंभीर आरोप करत तिचा छळ करण्यात आल्याचे पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यानंतर पोलिसांनी वैष्णवीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी हगवणे कुटुंबातील सासू, वैष्णवीचा पती शशांक आणि नणंद करिश्मा यांना अटक केली. यानंतर फरार असणाऱ्या सासऱ्याला आणि वैष्णवीच्या दीराला पोलिसांनी अटक केली आहे.

१७ मे पासून फरार असणाऱ्या राजेंद्र आणि सुशील हगवणे यांनी विविध ठिकाणी प्रवास केला. या दिवशी राजेंद्र हगवणे यांनी आलिशान गाडीतून औंध रुग्णलायाला भेट दिली. त्यानंतर थार गाडीतून मुहूर्त लॉन्स येथे गेले आणि तिथून वडगाव मावळमार्गे त्यांनी पवना डॅम येथील एका फॉर्म हाऊसला मुक्काम केला.



१८ मे रोजी ते आळंदी येथे एका लॉजवर मुक्कामाला होते. त्याच दिवशी ते पुन्हा थार गाडीतून वडगाव मावळ येथे आले. तेथील बंडू फाटक यांच्याकडे बलेनो गाडीने प्रवास केला.

१९ मे रोजी ते पुसेगाव येथील अमोल जाधव यांच्या शेतावर पोहोचले. त्यानंतर पसरणीमार्गे कोगनोळी येथील हॉटेल हेरिटेज येथे १९ आणि २० मे या दोन दिवशी त्यांनी मुक्काम केला. त्यानंतर २१ मे आणि २२ मे रोजी प्रीतम पाटील नावाच्या व्यक्तीच्या शेतावर ते थांबले २२ रोजी ते पुण्याकडे परतत असताना त्यांना पोलिसांनी एका हॉटेलमधून ताब्यात घेतले.

पोलिसांनी राजेंद्र आणि सुशील यांना अटक केली असून आता त्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणी लवकरच कोर्टात दोषारोपपत्र दाखल करण्याची शक्यता आहे.

नेमकं प्रकरण काय ?

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे (वय २३) वर्ष हिने तिच्या राहत्या घरी आत्महत्या केल्याच्या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात दररोज अनेक नवी माहिती समोर येत आहे. सुनेचा सासऱ्याच्या लोकांकडून छळ होत असल्याच्या वैष्णवीच्या वडिलांन पोलिसांत केलेल्या तक्रारीनंतर हे प्रकरण सर्वांनासमोर आले. वैष्णवीच्या श्वविच्छेदन अहवाल (पोस्टमार्टेम रिपोर्ट)मध्ये देखील धक्कादायक माहिती समोर आली होती. या अहवालात तिचा मृत्यू गळा दाबून झाल्याचे निष्पन्न झाले होते.

वैष्णवीस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पोलिसांनी तिचा पती शशांक राजेंद्र हगवणे, सासू लता राजेंद्र हगवणे, नणंद करिश्मा राजेंद्र हगवणे यांना अटक केली आहे. न्यायालयाने या सर्व आरोपींना पोलिस कोठडी सुनावली आहे. आता पोलिसांनी सासरा राजेंद्र तुकाराम हगवणे व दीर सुशील राजेंद्र हगवणे यांना देखील अटक केली आहे.

# पर्यावरणाच्या संवर्धनासाठी पर्यावरणवादी आवाज उठवणार; रिव्हर फ्रंटला विरोध का?

**पुणे । प्रतिनिधी**

नदी प्रदूषणाबद्दल पर्यावरणवाद्यांची चिंता सातत्याने वाढत आहे. दूसरीकड़े प्रशासन ‘विकासाच्या आंधळ्या शर्यतीत’ व्यस्त असल्याचे दिसून येते. स्थानिक प्रशासन नदी संवर्धन आणि विकासाच्या (रिव्हरफ्रंट) नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च करत आहे, परंतु नदी प्रदूषणाचे ठोस व्यवस्थापन आणि पर्यावरणीय आणि तांत्रिक बाबींवर समाधानकारक उत्तर देण्यात अपयशी ठरले आहे. म्हणूनच पर्यावरणवादी या नदी पुनर्विकास (रिव्हर फ्रंट) प्रकल्पाला विरोध करत आहेत.

पर्यावरणवाद्यांचा विरोध आणि चिंता

नदी प्रदूषण आणि पुनर्विकासावरील पर्यावरणवाद्यांच्या निषेधाबाबत (आंदोलनाबाबत) युथ ऑर्गनायझेशन फॉर ग्रीन (योगी) चे संस्थापक गिरीश पाटील यांच्याशी संवाद साधला. पाटील म्हणतात की शहराचा विस्तार वाढवून, पाण्याची वाढती मागणी आणि सांडपाण्याच्या पाण्याचे ठोस व्यवस्थापन करूनच नदीला प्रदूषणाच्या विळख्यातुन वाचवता येईल. पुनर्विकास प्रकल्पांतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी चुकीच्या ठिकाणी खर्च केला जात असल्याचा त्यांचा आरोप आहे. नदीचा विकास



आवश्यक आहे, परंतु पर्यावरणाला होणारे नुकसान हेही तितकेच वाइट आहे., जे पर्यावरण तसेच मानवतेसाठी धोकादायक आहे.

पर्यावरणवाद्यांचे म्हणणे आहे की पुण्यातील जीवनदायी मुळा-मुठा आणि इंद्रायणी नद्या प्रदूषणामुळे गुदमरत आहेत. अशा परिस्थितीत प्रशासनाचे उच्च अधिकारी आणि लोकप्रतिनिधी नदी पुनर्विकासावर जोर देत आहेत. पर्यावरणवाद्यांचा असा विश्वास आहे की विकास आवश्यक आहे, परंतु पर्यावरणाला नुकसान पोहचवून होणारा विकास हा कुठेतरी चुकीचा आहे. ह्याला विरोध होणारच, ह्यामुळे विशेष काळजी घेतली गेली पाहिजे. नदी स्वच्छ करणे, ती खोल करणे आणि नदीत सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबद्दल कोणीही बोलत नाही.

जनतेच्या मतांनी पदांवर बसलेल्या लोकांच्या तोंडून समस्येवर शब्द देखील निघत नाही आहे ह्यांचे आश्चर्य वाटते. नदी स्वच्छ करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत, परंतु नदीची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. अशा परिस्थितीत लोकांना पुढे यावे लागेल. मुळा-मुठा नदीवरील सुरू असलेल्या आंदोलनाच्या धर्तीवर, लवकरच पवना-इंद्रायणी नदीच्या संवर्धनासाठी अनेक आंदोलने केली जातील. राज्य सरकार नदी संवर्धनाबाबत फक्त कागदोपत्री दावे करते, परंतु प्रत्यक्षात नदीची स्थिती सतत खालावत चालली आहे आणि त्याकडे कोणीही लक्ष देत नाही, असा त्यांचा आरोप आहे.